

**अलिबाग : नारळी पौर्णिमेचा सण रायगड जिल्ह्यात उत्साहात साजरा झाला. या निमित्ताने समुद्राला नारळ अर्पण करण्यासाठी कोळी बंधू, भगिनींनी वाजत गाजत, नृत्य करीत मिरवणूक काढली होती.** (छाया : जितू शिगवण)

वृत्त पान २ वर..

रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १८ ◆ अंक २३
www.ramprahar.com

शनिवार ९ ऑगस्ट २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग

पनवेलच्या शाळांमध्ये एक राखी सैनिकांसाठी उपक्रम/3
पोलादपुरात सहा लाखांचा बनावट दारूसाठा जप्त/५
आशिया चषक स्पर्धेतून ऋषभ पंत 'आऊट'/८

# पायाभूत सुविधांच्या प्रकल्पांना गती द्या

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे निर्देश

**पुणे : प्रतिनिधी**

पूर्व नियोजन, कालमर्यादा, पारदर्शकता, गुणवत्ता आणि विविध विभागांच्या समन्वयाच्या माध्यमातून राज्यातील पायाभूत सुविधा विकास प्रकल्पांची गतीने उभारणी करून सर्व यंत्रणांनी एकत्रितरित्या एक ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे उद्दिष्ट साध्य करावे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी येथे आयोजित पायाभूत सुविधा विकास प्रकल्प प्रशिक्षणाचे मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते शुक्रवारी (दि. ८) उद्घाटन करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते. उद्घाटन समारंभास उपमुख्यमंत्री तथा पुण्याचे पालकमंत्री अजित पवार, 'मित्रा' संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीणसिंह परदेशी, मुख्य सचिव राजेशकुमार, प्रधान सचिव अश्विनी भिडे आदी उपस्थित होते.



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, राज्याच्या अर्थव्यवस्थेची वाटचाल एक ट्रिलियन डॉलरकडे सुरू आहे. ही वाटचाल अधिक गतीने होण्यासाठी राज्यात पायाभूत सुविधा विकास प्रकल्प महत्वाचे आहेत. पूर्व नियोजनाच्या माध्यमातून असे प्रकल्प वेळेत पूर्ण करण्यासोबत त्यांची गुणवत्ता व उपयोगिता वाढते. राज्याने रस्ते, रेल्वे, पूल, भुयारी मार्गासह विविध अभियांत्रिकी प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण केले आहेत. त्याचा समृद्ध अनुभव आपल्या गाठिशी आहे. प्रकल्पांच्या उभारणीत गतिशक्ती, जिओ डेटासारख्या सुविधा उपलब्ध आहेत. शासनाच्या विविध विभागांकडे डेटा उपलब्ध आहे, त्याचा उपयोग करून घेण्यासाठी विभागांमध्ये समन्वय महत्त्वाचा आहे. त्याबरोबरच नियोजनासाठी क्षेत्रीय पाहणी आवश्यक आहे. असलेल्या माहितीचा योग्यवेळी उपयोग करून विकासप्रकल्पांना चांगली गती देता येते.

प्रकल्पांसाठी विकासक निवडताना त्याच्या क्षमतांचा विचार करणे गरजेचे आहे. प्रकल्पाचे करार करताना राज्याच्या हिताच्या दृष्टीने सूक्ष्म अभ्यासाद्वारे त्यात आवश्यक सर्वच बाबींचा समावेश करायला हवा. प्रकल्प पूर्ण होत असताना काम गुणवत्तापूर्ण आणि दर्जेदार होत असल्याची खात्री करून त्याचे वेळोवेळी पर्यवेक्षण होणे आवश्यक आहे. भूसंपादनाअभावी प्रकल्पाची किंमत वाढू नये यासाठी भूसंपादन वेळेत पूर्ण होईल आणि त्याचा मोबदला वेळेवर अदा होईल याची दक्षता घ्यावी. भूसंपादन पूर्ण झाल्यावर प्रकल्पाची सुरुवात करावी, असे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले की, पायाभूत प्रकल्प हे विकसित महाराष्ट्राच्या वाटचालीत महत्त्वाचे पाऊल असून विकसित राज्याच्या विकासदृष्टीचे आणि धोरणाचे साक्षीदार आहेत.

'मित्रा'चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीणसिंह परदेशी यांनी राज्यातील पायाभूत सुविधा विकास प्रकल्पासाठी उपलब्ध असलेल्या निधीबाबत सादरीकरणाद्वारे माहिती दिली. कार्यक्रमाला राज्यातील वरिष्ठ प्रशासकीय अधिकारी उपस्थित होते.



## नव्या पिढीने अधिक प्रगती करावी -लोकनेते रामशेठ ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जिल्हा परिषदेच्या मराठी शाळेत शिकणारा राम ठाकूर जर रामशेठ ठाकूर होत असेल, लोकसभेला निवडून येऊन खासदार होत असेल, तर आताची पिढी आमच्यापेक्षाही जास्त हुशार आहे. त्यामुळे ते आमच्याहून अधिक प्रगती करून दाखवू शकतात, असे प्रतिपादन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी खारघर येथे केले.



जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खारघर येथील रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलचा १४वा इन्वेस्टिचर समारंभ आणि सांस्कृतिक महोत्सव गुरुवारी (दि. ७) उत्साहात साजरा झाला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान संस्थेचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी भूषविले. तर प्रमुख पाहुणे म्हणून आमदार प्रशांत ठाकूर उपस्थित होते. त्या वेळी ते मार्गदर्शन करीत होते.

कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष अरुणशेठ भगत, व्हाईस चेअरमन वाय.टी. देशमुख, शकुंतला ठाकूर, पनवेल महापालिकेचे माजी सभागृहनेते परेश ठाकूर, संस्थेचे सचिव डॉ. एस.टी गडदे, भाजप खारघर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, जिल्हा चिटणीस ब्रिजेश पटेल, प्रभाकर जोशी, माजी नगरसेवक अभिमन्यू पाटील, नरेश ठाकूर, माजी नगरसेविका हर्षदा उपाध्याय, वर्षा ठाकूर, अर्चना ठाकूर, स्वप्नील ठाकूर, राहुल घरत, मुख्याध्यापिका राज अलोनी, अमोघ ठाकूर, आदेश ठाकूर यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी उपस्थित होते.

या वेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा सत्कार करण्यात आला, तर त्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना कौन्सिल मेंबर्सची पदे बहाल करण्यात आली. दहावी व बारावीच्या परीक्षेत सर्वोत्तम यश मिळवलेल्या विद्यार्थ्यांना रोख पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर केले. यामध्ये भरत नाट्यम, मल्हार वारी, नटरंग उभा, टॉलीवूड मसाला, पंजाब फ्युजन, देसी धमाका यांचा समावेश होता. विद्यार्थ्यांच्या अदाकारीने उपस्थितांची मने जिंकली.

## 'आमच्याकडे तर ते नेहमी पहिल्या रांगेत राहिले'

**पुणे** : लोकसभेचे विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी इंडिया आघाडीच्या सर्वपक्षीय नेत्यांना ७ ऑगस्ट रोजी रात्री जेवणासाठी आमंत्रित केले होते. या बैठकीसाठी राज्यातून शिवसेना उबाठा पक्षप्रमुख उद्धव ठाकरे, युवा नेते आमदार आदित्य ठाकरे आणि खासदार संजय राऊत हेही सहभागी झाले होते. या बैठकीत उद्धव ठाकरे मागील रांगेत बसलेले दिसले. यावरून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना विचारले असता यांनी प्रसारमाध्यमांना प्रतिक्रिया दिली.



मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, आमच्याकडे तर ते नेहमी पहिल्या रांगेत राहिले. आमच्याकडे आमच्यापेक्षाही पहिले ते राहिले. त्यामुळे तिथे त्यांचा काय मान-सन्मान आहे तो आपल्या लक्षातच आलेला आहे. भाषणात खूप म्हणायचे दिल्लीसमोर मान झुकणार नाही. दिल्लीसमोर आम्ही पायघड्या टाकणार नाही, मात्र आता सत्तेत नसता दिल्लीत काय स्थिती आहे? हे पाहून थोडे दु:ख होते, पण ठीक आहे.

राहुल गांधींवर टीका करताना मुख्यमंत्र्यांनी म्हटले की, अलीकडच्या काळात राहुल गांधी यांनी सलीम जावेद यांच्याशी संपर्क साधून एक स्क्रिप्ट लिहून घेतली आहे. अतिशय मनोरंजनात्मक ही स्क्रिप्ट सगळीकडे मांडत आहेत, पण यातून मनोरंजनाशिवाय काहीच होणार नाही. एकही तथ्य त्यांनी मांडलेले नाही. सगळ्या गोष्टी काल्पनिक मांडत आहेत. ते एकीकडे मतदारयादीत समस्या आहे म्हणतात, आम्हालाही मान्य आहे. इतकी वर्षं आम्ही हेच सांगत आहोत. आमची व्यापक सुधारणेची मागणी होती. आता निवडणूक आयोग त्यासाठी तयार असताना आणि बिहारमध्ये सुरू केले तर त्यालाही विरोध करतात. मग नेमके त्यांना काय हवे आहे? त्यांना केवळ आपल्या पराभवाचे कारण शोधून काढायचे आहे आणि त्यांनी ते काढले आहे, असा टोलाही मुख्यमंत्र्यांनी लगावला.

## निवडक

### पंतप्रधान मोदींचा रशियाचे अध्यक्ष पुतिन यांच्याशी संवाद

**नवी दिल्ली** : रशियाकडून तेल खरेदी करत असल्यावरून अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतीय मालावर २५ टक्के अतिरिक्त शुल्क लादले आहे. अमेरिकेच्या दबावाला न जुमानता भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शुक्रवारी (दि. ८) रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादिमिर पुतिन यांच्याशी फोनवरून संवाद साधला. या दोन्ही नेत्यांमध्ये महत्त्वाच्या मुद्द्यांवर चर्चा झाली. याबरोबरच पंतप्रधान मोदींनी रशियाचे राष्ट्राध्यक्ष पुतिन यांना भारत भेटीचे आमंत्रणही दिले आहे.

### केंद्राकडून आयकर विधेयक मागे; नवे विधेयक होणार सादर

**नवी दिल्ली** : केंद्र सरकारने आयकर विधेयक मागे घेतले आहे. सरकार आता नवीन विधेयक सभागृहात सादर करणार आहे. फेब्रुवारी २०२५मध्ये लोकसभेच्या पटलावर ठेवल्यानंतर या विधेयकाला निवड समितीकडे पाठवण्यात आले होते. निवड समितीच्या सर्व सूचनांचे स्वीकार केल्यानंतर सुधारित आयकर विधेयक ११ ऑगस्ट रोजी लोकसभेत सादर केले जाणार आहे.

## जि.प. शाळांना निधी कमी पडू देणार नाही -आमदार महेश बालदी

**चौक, रसायनी : प्रतिनिधी**

माझी आर्थिक परिस्थिती चांगली होती. तरीही वडिलांनी मला जिल्हा परिषद शाळेत दाखल केले. त्याचे कारण जिल्हा परिषदेच्या शाळेत संस्कार मिळतात. या परिसरातील जि.प. शाळांना निधी कमी पडू देणार नाही, असे आश्वासन आमदार महेश बालदी यांनी शुक्रवारी (दि. ८) दिले.



भाजपचे नेते व मोहोपाडा ग्रामपंचायतीचे माजी सरपंच कृष्णा पारंगे यांचा वाढदिवस विविध समाजोपयोगी उपक्रम आयोजित करून साजरा करण्यात आला. यानिमित्ताने मोहोपाडा येथील जि.प. शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप आमदार महेश बालदी यांच्या हस्ते करण्यात आले. त्या वेळी ते बोलत होते.

या कार्यक्रमास जिल्हा उपाध्यक्ष सुधीर ठोंबरे, तालुकाध्यक्ष प्रवीण मोरे, माजी जि.प. सदस्य मोतीराम ठोंबरे, वासांबे विभागीय अध्यक्ष सचिन तांडेल, माजी सभापती कांचन पारंगे, जगदीश पवार, दत्ता जांभळे, ग्रामपंचायत सदस्य आकाश जुईकर, रसिका खराडे, दीपक कांबळी, अरुण गायकवाड, अनिल पिंगळे, सद्गुणा पाटील, अमित शहा, माजी सरपंच रोशन राऊत, शहर प्रमुख चेतन जाधव यांच्यासह कार्यकर्ते, शिक्षक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

आपण ज्या शाळेत शिकलो त्या शाळेत शैक्षणिक साहित्य वाटप करून शाळेचे उपकार फेडण्याचे कार्य कृष्णा पारंगे यांनी केले. यातून त्यांच्या समाजाप्रती असलेल्या भावना दिसल्या, असे गौरवोद्गार आमदार महेश बालदी यांनी काढले. या वेळी ७९९ विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले.

## आर्थिक मदत



**पनवेल : रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी संस्थेच्या मोखाडा येथील लोकनेते रामशेठ ठाकूर कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाला ३० लाखांची आर्थिक मदत केली आहे. या मदतीचा धनादेश त्यांनी गुरुवारी 'रयत'चे विभागीय अधिकारी मोहन कोंगरे यांच्याकडे सुपूर्द केला. या वेळी जनरल बॉडी सदस्य वाय.टी देशमुख, कार्यालयीन सेवक संतोष गुजर, वैभव गावंड आदी उपस्थित होते.**

## राखी खरेदी



**पनवेल : बहीण भावाचे अतूट नाते जपणारा रक्षाबंधन सण शनिवारी आहे. या पार्श्वभूमीवर बाजारपेठेत राख्या खरेदी करण्यासाठी महिलावर्गाने गर्दी केली होती.** (छाया : सुबोध ठाकूर)

## 'रायगडात युरिया खताचा मुबलक साठा'

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड जिल्ह्यात खरीप हंगामात भात हे प्रमुख पीक असून सध्या ते वाढीच्या अवस्थेत आहे. याच टप्प्यावर पीक जोमाने वाढण्यासाठी आवश्यक असलेल्या खतांची मागणी मोठ्या प्रमाणावर वाढते. जिल्ह्यातील भात पिकासाठी युरिया खताचा मुबलक साठा उपलब्ध असल्याचे रायगड जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वंदना शिंदे यांनी सांगितले.

रायगड जिल्ह्यास १ एप्रिल ते ३० सप्टेंबर या खरीप कालावधीसाठी एकूण ११ हजार ९३१ मेट्रिक टन युरिया खताचे आवंटन मंजूर झाले आहे. त्यापैकी १ एप्रिलपासून ७ ऑगस्टपर्यंत नऊ हजार १५० मेट्रिक टन युरिया जिल्ह्यात पोहचवण्यात आले आहे. यासोबतच बफर स्टॉकमधून आणखी ६९८ मेट्रिक टन युरिया खताचा पुरवठा करण्यात आला असून आतापर्यंत एकूण ९,८४८ मेट्रिक टन युरिया शेतकऱ्यांच्या सेवेत उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. १ ते ७ ऑगस्ट या आठवड्यात एकट्या आरसीएफ कंपनीकडून ७९० मेट्रिक टन युरिया खताचा पुरवठा जिल्ह्यात करण्यात आला आहे. उर्वरित युरिया खतही येत्या काही दिवसांत नियमित व टप्प्याटप्प्याने जिल्ह्यात पोहचवले जाणार आहे.



शेतकऱ्यांनी अधिकृत परवानाधारक कृषी सेवा केंद्रांवरूनच खत खरेदी करावी. यासोबतच सरकारने निर्धारित केलेल्या दरानुसारच खरेदी करावी व घेतलेल्या खताची पक्की पावती, बिल अवश्य घ्यावे. काही गैरप्रकार, जसे की जादा दर, नकली खत विक्री, किंवा बिल न देणे आढळल्यास शेतकऱ्यांनी तालुका कृषी अधिकारी किंवा जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयाशी त्वरित संपर्क साधावा व तक्रार नोंदवावी, असे आवाहन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी वंदना शिंदे यांनी केले आहे.

राज्यात शेतकऱ्यांकडून रासायनिक खतांची मागणी मृगाचा पाऊस पडल्यानंतरच वाढते. त्यामुळे खतांचे नियोजन एप्रिलपासून सुरू करण्यात येते. शेतकऱ्यांसाठी मुबलक प्रमाणात खत उपलब्ध राहील यासाठी कृषी विभाग दक्ष असल्याचे दिसून येत आहे.

## दुचाकी अपघातात दोन जणांचा मृत्यू

**खालापूर, चौक : प्रतिनिधी**

मुंबई-पुणे महामार्गावर खालापूर तालुक्यातील विणेगावजवळ शुक्रवारी (दि. ८) दुपारी दीडच्या सुमारास एक स्पोर्ट्स बाईक झाडावर आदळली. या अपघातात दोन जणांचा मृत्यू झाला आहे.



मयत दोन तरुण दुचाकीवरून (एमएच ०३ ईपी २८६३) मुंबईहून पुण्याला परतत होते. अपघात एवढा भीषण होता की गाडीचे तुकडे झाले. अपघातात विशाल दत्तात्रेय गायकवाड (वय २०, रा. बीड) हा जागीच ठार झाला, तर राहुल रज्ञाम बात्तूला (वय २०, रा. मानखुर्द, मुंबई) याला कामोठे एमजीएम रुग्णालयात उपचारादरम्यान मृत्यू झाला. या अपघाताबाबत खालापूर पोलीस अधिक तपास करीत आहेत.

# आगामी सण, उत्सवांची सर्वत्र तयारी आणि विविध उपक्रम

## हर घर तिरंगा अभियानांतर्गत पत्रलेखन स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महापालिकेमार्फत घरोघरी तिरंगा-हर घर तिरंगा अभियान पनवेल महानगरपालिका क्षेत्रात १५ ऑगस्ट पर्यंत विविध उपक्रमांच्या माध्यमातून मोठ्या उत्साहात राबविली जात आहे. या मोहीम अंतर्गत पनवेल महानगरपालिकेमार्फत डी.डी. विसपुते अध्यापक महाविद्यालयात पत्र लेखन स्पर्धा घेण्यात आली.




राष्ट्रप्रेम, राष्ट्रभक्ती आणि देशभक्तीने भारलेली ही पत्रे भारतीय सेनेच्या जवानांना, संरक्षण विभागास पाठविण्यात येणार आहे. लोकांच्या हृदयात देशभक्तीची भावना जागृत करणे तसेच भारतीय राष्ट्र ध्वजाबद्दल जागरूकता वाढविण्याच्यादृष्टीने 'घरोघरी तिरंगा' ही लोकचळवळ राबविण्यात येत आहे. ही मोहिम विविध उपक्रमांच्या माध्यमातून पालिका राबवित आहे. यात प्रामुख्याने शाळेच्या भिंती तिरंगा कलाकृतीने सजविणे. शाळा, शासकीय इमारती, सार्वजनिक जागा या ठिकाणी तिरंगा प्रदर्शनाचे आयोजन करणे त्याचप्रमाणे शाळा, महाविद्यालये, मॉल आदि ठिकाणी तिरंगा रांगोळी स्पर्धा , तिरंगा कार्यशाळा, प्रात्याक्षिके याचे आयोजन करणे. त्या सोबतच तिरंगा राखी निर्मिती, तिरंगा प्रश्नमंजुषा, अशा विविध उपक्रम यामध्ये राबविले जाणार आहेत.

## गव्हाण विद्यालयात रक्षाबंधननिमित राखी प्रदर्शन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रक्षाबंधनाच्या पूर्वदिनी व नारळी पौर्णिमेच्या दिवशी रयत शिक्षण संस्थेच्या गव्हाण येथील श्री.छत्रपती शिवाजी विद्यालय व ज.आ.भगत ज्युनिअर कॉलेजमध्ये विद्यार्थ्यांनी स्वहस्ते बनविलेल्या 'राखी विक्री व प्रदर्शना'चे उद्घाटन रयत शिक्षण संस्थेचे माजी सहसचिव विवेक पाटील तथा व्ही.व्ही.पाटील यांचे हस्ते झाले.



प्राचार्या ज्योत्स्ना ठाकूर, पर्यवेक्षिका शशिकला पाटील, चारूशीला ठाकूर, शितलकुमार म्हात्रे, महेश म्हात्रे व अन्य शिक्षक उपस्थीत होते.

विद्यालयाच्या व्हरांड्यांमध्ये विद्यार्थ्यांनी स्वत: तयार केलेल्या वैविध्यपूर्ण आणि आकर्षक राख्यांचे स्टॉल्स लावले होते. या वेळी सांस्कृतिक विभाग प्रमुख एच.आर.पाटील यांनी बहीण-भावाच्या पवित्र नात्याची अभिव्यक्ती करणारी लोकप्रिय गीते सादर केली. इयत्ता नववी क या वर्गाच्या वतीने आयोजित कार्यक्रमाचे वर्गशिक्षिका चारूशीला ठाकूर यांनी अत्यंत नेटके आणि आटोपशीर नियोजन केले. यावेळी विद्यालयाच्या वतीने सर्व विद्यार्थी व त्यांच्या कुटुंबीयांना नारळी पौर्णिमेनिमित्त शुभेच्छा देण्यात आल्या.

# सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलचा सामाजिक बांधिलकी जपण्याचा प्रयत्न



## पोलीस ठाणे, अग्निशमन केंद्रातील अधिकाऱ्यांसह वृक्षांना रक्षाबंधन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूल यांच्या प्री-प्रायमरीच्या विद्यार्थ्यांनी रक्षाबंधन सण अनोख्या पद्धतीने साजरा करत शुक्रवारी (दि.८) उलवे पोलीस स्टेशन व अग्निशमन केंद्र येथे भेट दिली.

लहानग्यांनी पोलीस अधिकारी व अग्निशामक दलातील जवानांना रंगीबेरंगी राख्या बांधून त्यांच्याप्रती आपले प्रेम, कृतज्ञता व सन्मान व्यक्त केला तसेच स्कूल परिसरातील वृक्षांनादेखील राखी बांधून आपली पर्यावरणाप्रति असलेली भावना व्यक्त केल्या. या उपक्रमाचा उद्देश मुलांमध्ये सुरक्षिततेची जाणीव, सार्वजनिक सेवकांविषयी आदर, पर्यावरण संरक्षण जागृती आणि रक्षाबंधनाचा बंधुत्व व संरक्षणाचा संदेश रुजवणे हा होता. अधिकाऱ्यांनी व जवानांनी मुलांशी मनमोकळ्या गप्पा मारत त्यांना आपली वापरली जाणारी साधने दाखवली आणि समाजातील त्यांच्या कार्याची माहिती दिली.

राखी बांधून व गोड पदार्थांच्या वाटपाने हा कार्यक्रम अविस्मरणीय ठरला. स्कूल व्यवस्थापनाने उलवे पोलीस स्टेशन व अग्निशमन केंद्राच्या सर्व अधिकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

## मानाचा नारळ सागराला अर्पण



**श्रीवर्धन : श्रावण महिन्यातील पौर्णिमेला कोळी बांधवांच्या हृदयात विशेष स्थान असलेला नारळी पौर्णिमा सण यंदाही श्रीवर्धन तालुक्यात सागराच्या साक्षीने, हसऱ्या चेहऱ्यांनी आणि गाजणाऱ्या कोळीगीतांनी साजरा झाला.** (छाया : भरत चोगले)

## पेणच्या सुबक गणेशमूर्ती विक्रीसाठी माणगावात दाखल

**माणगाव : प्रतिनिधी**

गणरायाचे आगमन २७ ऑगस्ट २०२५ रोजी होत असून गणरायाच्या स्वागतासाठी माणगावकर सज्ज झाले असून बाजारपेठ विविध साहित्यांनी फुलली आहे.

माणगाव बाजारपेठेत एचडीएफसी बँकेच्या समोर मुंबई-गोवा महामार्गालगत वृत्तपत्र विक्रेते नितीन मेथा याठिकाणी सालाबादप्रमाणे सलग सातव्या वर्षी निलेश नामदेव रातवडकर यांनी आपल्या सई कला केंद्रात माणगाव येथे पेणच्या अर्धा फुटपासून ते चार फूट उंचीपर्यंतच्या गणरायाच्या सुबक मूर्ती



विक्रीसाठी ठेवल्या आहेत. याठिकाणी गणरायासाठी लागणाऱ्या आकर्षक फेटा,धोतर व डायमंड वर्क तयार करून मिळतील तसेच दहीहंडीसाठी लागणारे सुबक आकर्षक मडकी मिळतील, अशी माहिती निलेश रातवडकर व पायल रातवडकर यांनी दिली.

गणेशोत्सव हा कोकणातील सर्वात मोठा उत्सव समजला जातो. मुंबई,पुणे येथून मोठ्याप्रमाणात चाकरमानी आपल्या गावी कोकणात हा उत्सव साजरा करण्यासाठी येत असतात. माणगावची बाजारपेठ गणेश सजावटीसाठी आवश्यक असणाऱ्या विविध साहित्यांनी फुलली आहे. माणगाव बाजारपेठेत पेणच्या सुबक गणेश मूर्तींसह आरास तयार करण्यासाठी लागणारे आकर्षक थर्माकोलची मकरे, प्लॅस्टिकची फुले आदींची दुकाने आकर्षक स्वरूपात थाटली असून खरेदीसाठी बाजारपेठेत गणेशभक्तांची लगबग सुरू झालेली दिसत आहे.

## खंडाळा घाटातील पोलादी हाईट बॅरियर वाहनाच्या धडकेत जमीनदोस्त

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

खंडाळा घाटातून जुन्या मुंबई पुणे मार्गावरून थेट खोपोली गावात उतरण्यासाठी शॉर्टकट घेताना हाईट बॅरियरचा अंदाज न आल्याने अज्ञात वाहनाच्या धडकेत शुक्रवारी लोखंडी बॅरियर जमीनदोस्त झाले.

मुंबई-पुणे एक्सप्रेसला घाटात जुन्या मुंबई पुणे महामार्ग जोडला जातो त्या ठिकाणी हाईट बॅरिअर तसेच खिंडीत हाईट बॅरिअर बसविण्यात आले आहेत. गेल्या वर्षी जुन्या मुंबई पुणे महामार्गावर घाट उतरताना चालकाचे नियंत्रण सुटल्यामुळे बस दरीत कोसून झालेल्या अपघातात १३ जणांना जीव गमवावा लागला होता. मोठ्या वाहनांना प्रवेश निषिद्ध असताना देखील अनेक



जण नियम पायदळी तुडवत असल्याने अपघात घडले होते. घाटातून थेट खोपोली गावात उतरण्यासाठी हा मार्ग जरी शॉर्टकट असला तरी अवघड वळणामुळे थेट मृत्यूच्या दारात हा मार्ग जात होता. अपघातांना कायमचा पायबंद बसावा यासाठी लोखंडी अँगलचे हाईट बॅरिअर बसवण्यात आले.

काम पूर्ण झाल्यानंतर केवळ हलकी वाहने चारचाकी यांना मार्ग वापरता येतो. अडीच मीटर उंचीची मर्यादा असतानादेखील पिकअप चालक, मालवाहतूक करणारे टेम्पो शॉर्टकटसाठी धोकादायक मार्गाचा वापर करतात. लोखंडी अँगलचे बॅरियर डंपरने तोडल्यामुळे गेल्या वर्षी तुटलेल्या बॅरियरच्या जागी क्राँकिटचा भक्कम पाया करून त्यावर पोलादी बॅरियर बसविण्यात आले आहेत. शुक्रवारी पहाटे अज्ञात वाहनाने धडक दिल्याने बॅरिअर कोसळले होते. घटनेची माहिती मिळतात पोलीस निरीक्षक सचिन हिरे, आय आर बी यंत्रणा यांनी तातडीने घटनास्थळी भेट देऊन दुरुस्तीचे काम हाती घेतले आहे.

## 'अभ्यासोनी प्रकटावे' संवाद सोहळा

**मुंबई : प्रतिनिधी**

संस्कार भारतीचे अखिल भारतीय पूर्वाध्यक्ष राहिलेले दिग्दर्शक राजदत्त आणि चित्रकार वासुदेव कामत या कलातपस्वींच्या कारकीर्दीचा आढावा घेणारा 'अभ्यासोनी प्रकटावे' हा संवाद सोहळा ३ ऑगस्टला रवींद्र नाट्यमंदिरात झाला. गायिका उषा मंगेशकर या कार्यक्रमास प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

या वेळेस व्यासपीठावर राज्याचे सांस्कृतिकमंत्री ॲड. आशिष शेलार, संस्कार भारती केंद्रीय संघटनमंत्री अभिजित गोखले, संस्कार भारती कोकण प्रांत अध्यक्ष सुनील बर्वे, कोकण प्रांत कार्याध्यक्ष मुकुंद मराठे इत्यादी मान्यवर उपस्थित होते.




ॲड. आशिष शेलार यावेळेस म्हणाले की, चित्रपट दिग्दर्शन क्षेत्रातील मैलाचा दगड किंवा लिव्हिंग गॉड म्हणून ज्यांच्याकडे पाहता येईल असे राजदत्तजी यांचे व्यक्तिमत्त्व आहे.

या कार्यक्रमात राजदत्त आणि कामत यांचा उषा मंगेशकर यांच्या हस्ते मानपत्र देऊन सन्मान करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व संस्कार भारतीचे अध्यक्ष मैसूर मंजुनाथ यांनी दृकश्राव्यफितीच्या माध्यमातून राजदत्त व कामत यांना विशेष शुभेच्छा दिल्या.

सन्मानित मान्यवरांचे अनुभव, कार्य आणि विचार यावर आधारित चिंतनशील वार्तालाप कार्यक्रमाच्या उत्तरार्धात संपन्न झाला. अभ्यासोनी प्रकटावे या संकल्पनेअंतर्गत चतुरंग प्रतिष्ठानचे विद्याधर निमकर यांनी राजदत्त व वासुदेव कामत यांच्याशी अत्यंत हृद्य संवाद साधला. संस्कार भारतीचे कार्याध्यक्ष मुकुंद मराठे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक, तर कोकण प्रांत अध्यक्ष सुनील बर्वे यांनी उपस्थितंचे आभार मानले. मान्यवरांच्या मानपत्रांचे लेखन ज्येष्ठ पत्रकार सुधीर जोगळेकर यांनी केले.

पनवेलमधून संस्कार भारती कोकण प्रांत सहमंत्री ॲड. अमित चव्हाण, मंचीय कला संयोजक सुनिता खरे, साहित्य संयोजक अपर्णा नाडगौडी, पनवेल महानगर मंचीय संयोजक ॲड. योगेश पाटील यांचेही सहकार्य कार्यक्रमासाठी लाभले.

## रायगडात नारळी पौर्णिमा उत्साहात



**अलिबाग : प्रतिनिधी**

नारळी पौर्णिमा सण रायगड जिल्ह्यात सर्वत्र मोठ्या उत्साहात आणि भावपूर्ण वातावरणात साजरा झाला. या सणाचे औचित्य साधून ठिकठिकाणी नारळ फोडीच्या स्पर्धा झाल्या.

अलिबाग, मुरूड, नागाव, रेवदंडा, नवगाव, श्रीवर्धन, उरण आदी समुद्रकिनारी नारळी पौर्णिमेच्या पार्श्वभूमीवर कोळी-आगरी बांधवांनी मोठी गर्दी केली होती. सोन्याच्या मुलामा दिलेला नारळ सागराला अर्पण करण्यासाठी वाजत-गाजत नाचत मिरवणूक काढण्यात आली. एकाच पेहरावात मिरवणुकीत सहभागी झालेले कोळी बांधव, भगिनी, विशिष्ट ठेक्यात नाचताना लक्ष वेधून घेत होते. शनिवारपासून (दि. ९) मच्छिमार खोल समुद्रात मासेमारी करण्यासाठी आपल्या होड्या घेऊन निघतील.

अलिबाग तालुक्यात रेवस, मांडवा, बोडणी, सासवणे, अलिबाग, चेंढरे, किहीम, रेवदंडा आदी ठिकाणी या नारळ फोडीच्या स्पर्धा आयोजीत करण्यात आल्या होत्या. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आणि पाहण्यासाठी नागरीकांनी मोठी गर्दी केली होती.

## भविष्यातील शिक्षणासाठी आधुनिक अंगणवाड्या

**मुंबई : प्रतिनिधी**

पारंपरिक शिक्षण पद्धत व भविष्याचा वेध घेत आवश्यक असलेले अभ्यासक्रम याची योग्य प्रकारे सांगड घालत जर अंगणवाडीतूनच त्या बालकाला घडवले तर भविष्यात त्याला त्या बाळकडूचा खूप लाभ होईल. हाच धागा पकडत समाजाचे देणं म्हणून गोदरेज ग्रुपने राज्यभर भविष्यातील आधुनिक अंगणवाड्या निर्माण करण्याचे कार्य सुरू केले आहे, अशी माहिती गोदरेज एंटरप्रायझेसच्या सीएसआर प्रमुख अश्विनी देवदेशमुख यांनी पत्रकार परिषदेत दिली.



खालापूर तालुक्यात तांबाटी गावात एकात्मिक बाल विकास सेवा व गोदरेज कंपनीच्या सामाजिक दायित्व फंडातून अंगणवाडीचे उद्घाटन नुकतेच देवदेशमुख यांनी केले. या वेळी नायब तहसीलदार सुधाकर राठोड, सरपंच अविनाश आमले, पोलीस निरीक्षक सचिन पवार, राजेंद्र पाशीलकर, रमेश भांडारकर, तानाजी चव्हाण, ग्रामपंचायत सदस्य हरिभाऊ जाधव, संतोष दळवी, अरुणा सावंत, सुगंधा जाधव, ग्रामसेवक प्रशांत कदम उपस्थित होते.

## रामशेठ ठाकूर महाविद्यालयात शिष्यवृत्ती अर्ज प्रक्रियेवर मार्गदर्शन सत्र

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात गुरुवारी (दि.७) शिष्यवृत्ती व फ्रीशिप समितीतर्फे विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती अर्ज प्रक्रियेविषयी मार्गदर्शन करण्यासाठी विशेष सत्राचे आयोजन करण्यात आले.



या सत्राचा उद्देश विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती अर्ज भरण्याच्या प्रक्रियेबाबत सविस्तर माहिती देणे आणि त्यांना येणाऱ्या अडचणी दूर करणे हा होता. या सत्रात प्रा. विशाल देशमुख व प्रा. प्रथमेश ठाकूर यांनी शिष्यवृत्ती व फ्रीशिप योजनेचे महत्त्व सांगून अर्ज भरण्याच्या टप्प्यांची माहिती दिली तसेच विद्यार्थ्यांनी कोणती कागदपत्रे सादर करावी लागतात, अर्ज कसा भरावा, कोणत्या शिष्यवृत्तीसाठी कोण पात्र आहे, तसेच अर्जात टाळायच्या चुका यावरही त्यांनी प्रकाश टाकला.

विद्यार्थ्यांनी शंका व अडचणी मांडल्या, ज्यांना समितीच्या सदस्यांनी उत्तरे दिली. प्रभारी प्राचार्या डॉ. माहेश्वरी झिरपे यांनी या उपक्रमाचे कौतुक केले व विद्यार्थ्यांनी या संधीचा पुरेपूर लाभ घ्यावा असे आवाहन केले. या मार्गदर्शन सत्रास अनेक विद्यार्थ्यांची उपस्थिती लाभली व त्यांना शिष्यवृत्ती अर्ज प्रक्रियेबाबत निश्चितता आणि आत्मविश्वास मिळाला.

हा शैक्षणिक उपक्रम यशस्वी होण्यासाठी महाविद्यालयातील शिष्यवृत्ती व फ्रीशिप समितीतील सर्व सदस्य, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.

## निवडक

### ट्रेलरची स्कुटीला धडक; एकाचा मृत्यू

**पनवेल :** मुंब्रा महामार्गावरील कळंबोली पोलीस ठाण्याशेजारील सेवा रस्त्यावर कळंबोली गावातील शर्मा बेकरीशेजारी राहणारा अनिकेत जाधव हा कामावर बीमा कॉम्प्लेक्स येथे स्कूटीवरून जात असताना मागून आलेल्या ट्रेलरने अनिकेतच्या स्कूटीला धडक दिली. रस्त्यावर कोसळलेल्या अनिकेतच्या अंगावरून ट्रेलरचे चाक गेल्याने अनिकेत जागीच ठार झाला. याबाबत कळंबोली पोलीस ठाण्यात २३ वर्षीय ट्रेलर चालक शिवप्रकाश वर्मा याच्यावर हलगर्जीपणाने ट्रेलर चालविल्यामुळे गुन्हा नोंद करण्यात आला असून सहाय्यक पोलीस निरीक्षक तृप्ती शेळके या अधिक तपास करीत आहेत.

### एटीएममधून पैसे काढून फसवणूक

**पनवेल :** एटीएम कार्डची अदलाबदली करून अकाउंट मधून २५ हजार रुपये काढून फसवणूक केल्या प्रकरणी अनोळखी इसमाविरोधात खारघर पोलीस ठाण्यात चार ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. नामदेव पाटील सेक्टर १५, खारघर येथे राहत असून ते ३१ जुलै रोजी एटीएममध्ये पैसे काढण्यासाठी गेले होते. यावेळी एक अनोळखी व्यक्ती त्यांच्याजवळ येऊन उभा राहिला आणि काका लवकर पैसे काढा असे बोलून त्यांचे पैसे निघत नसल्याने त्यांना बॅलन्स चेक करण्यास सांगितले आणि त्यांना बोलण्यात गुंतवले. त्यानंतर त्यांच्याकडे जे कार्ड होते त्यातून पैसे निघाले नाही म्हणून त्यांनी बँकेच्या कर्मचाऱ्याला बोलावले. तेव्हा त्यांनी सांगितले की एटीएम कार्ड तुमचे नाही. त्यानंतर त्यांच्या मुलाचा फोन आला आणि तुमच्या अकाउंट मधून २५ हजार रुपये डेबिट झाल्याचे सांगितले. या वेळी पाठीमागे उभा असलेला इसमाने बोलण्यात गुंतवून त्यांची एटीएम कार्डची अदलाबदली केल्याचे त्यांना समजून आले.

# खारपाटील बंधूंचे कार्य प्रेरणादायी -लोकनेते रामशेठ ठाकूर

## पुस्तकाचे प्रकाशन; कॉलेजचे भूमिपूजन





**उरण : प्रतिनिधी**

खारपाटील बंधूंनी कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचे हाती घेतलेले कार्य अतिशय चांगले असून ते ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उपयुक्त ठरणारे असून, समाजाला प्रेरणा देणारे असेच आहे, असे गौरवोद्गार लोकनेते, माजी खासदार रामशेठ ठाकूर यांनी चिरनेर येथे काढले. नामांकित उद्योगपती पी. पी. खारपाटील यांच्या ७० व्या वाढदिवसाचे औचित्य साधून, पी.पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या परशुराम धाकू खारपाटील कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयाचा भूमिपूजन सोहळा नारळी पौर्णिमेच्या शुभमुहूर्तावर शुक्रवारी आयोजित करण्यात आला होता.

या निमित्ताने पी.पी. खारपाटील यांचा जीवन प्रवास उलगडणाऱ्या 'पांडुरंग वारी' या पुस्तकाचे प्रकाशन तसेच नियोजित भूमिपूजन रामशेठ ठाकूर यांच्या हस्ते करण्यात आले. या वेळी ते आपल्याला उद्घाटनपर भाषणात बोलत होते. या वेळी उत्सवमूर्ती पी.पी. खारपाटील यांचा ७० वा. वाढदिवस ७० दिव्यांची ओवाळणी करून व केक कापून साजरा करण्यात आला. तसेच या वेळी पी.पी. खारपाटील यांचा जीवनपट उलगडणाऱ्या पांडुरंग वारी या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले. यापुढे लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पी.पी. खारपाटील यांनी माध्यमिक शाळा, ज्युनिअर कॉलेज आणि आता ग्रामीण विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयीन शिक्षणाची गंगोत्री आणली. त्यांनी टाकलेले हे पुढचे पाऊल कौतुकास्पद आहे. मी स्वतः तसेच जे. एम. म्हात्रे आणि पी.पी. खारपाटील उद्योग क्षेत्रात आहोत. त्रिमूर्ती म्हणून निवेदकाने आमचा उल्लेख केला.

आमची या उद्योग क्षेत्रात चढाओढ अशी नाही. किंवा स्पर्धा नाही. असे सांगून, मी माझ्या आईच्या नावाने पनवेल येथे लॉ कॉलेज काढले आहे. बॅरिस्टर ए आर.अंतुले, ॲड. दत्ता पाटील, लोकनेते दि.बा. पाटील यांच्या हस्ते त्यावेळी लॉ कॉलेजचे उद्घाटन झाले. ग्रामीण विद्यार्थ्यांना लॉ कॉलेजचा फायदा झाला. इंग्रजी माध्यमाच्याही शाळा मोठ्या प्रमाणावर सुरू झाल्या आहेत. त्यामुळे सध्याच्या परिस्थितीत शिक्षणाकडे लक्ष देणे गरजेचे आहे. आपली पुढची पिढी शिक्षणात सक्षम व्हावी यासाठी दर्जेदार आणि अपेक्षित शिक्षणाची गरज आहे. खारपाटील करीत असलेले कार्य हे प्रेरणादायी असेच आहे. आपला बहुजन समाज आता मागे राहिलेला नाही. तर तो सर्व क्षेत्रात पुढे येत आहे. मी २०२१ ला रिटायर झालो. आता शैक्षणिक कामात जास्त लक्ष घातले असून, शैक्षणिक क्षेत्रात दिशा देण्याचे काम मी आता करीत असल्याचे त्यांनी या वेळी सांगितले.

माजी नगराध्यक्ष जे. एम. म्हात्रे यांनी सांगितले की, चिरनेरचे राजकारण फार वेगळं आहे. हे लोक विकास कामासाठी राजकारणाच्या चपला बाहेर ठेवून एकत्र येतात. ही गोष्ट चिरनेर गावाच्या विकासासाठी मोठी आहे. त्यामुळे चिरनेरचा विकास झालेला दिसून येतो. कार्यक्रमावेळी उद्योगपती पी.पी. खारपाटील यांचे अभिष्टचिंतन करण्यासाठी विविध क्षेत्रातील मान्यवरांनी भेटी देऊन, त्यांचे अभिष्टचिंतन केले.

या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून उरणचे आमदार महेश बालदी, माजी नागराध्यक्ष जे.एम.म्हात्रे, ॲड.प्रविण ठाकूर, विनोद चव्हाण चिरनेर ग्रामपंचायतीचे सरपंच भास्कर मोकल, हेमंत पाटील, संतोष ठाकूर, सुरेश पाटील, माधुरी गोसावी, वर्षा खारपाटील, उद्योजक राजाशेठ खारपाटील, सुनीता खारपाटील, सहाय्यक पोलीस अधिकारी विनोद चव्हाण, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष परिक्षित ठाकूर, पोलीस सहाय्यक आयुक्त किशोर गायके, अमित भुजबळ, वपोनि जितेंद्र मिसाळ, सीमा घरत, मेघनाथ तांडेल, सत्यवान भगत, रविशेठ पाटील, सरपंच किर्तीनिधी ठाकूर, प्रकाश ठाकूर, सरपंच अजित पाटील, सुरेश पाटील, माजी सरपंच विलास पाटील, समीर मढवी, रमाकांत पाटील, तहसीलदार डॉ. उध्दव कदम, सार्वजनिक बांधकाम विभाग उरण उप अभियंता नरेश पवार, माजी जिल्हा परिषद सदस्य ज्ञानेश्वर घरत, डॉ युवराज पाटील, डि के पाटील, माजी सरपंच बबन गोंधळी, प्राचार्य सुप्रिया म्हात्रे, माजी सरपंच वसंत चिर्लेकर, उद्योजक देवेंद्र पाटील आदी उपस्थित होते. उपस्थितांचे स्वागत राजेंद्र खारपाटील, समीर खारपाटील व सागर खारपाटील यांनी केले.

## सराईत दुचाकी चोरट्यास पोलिसांनी घेतले ताब्यात

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल परिसरात दुचाकी चोरणाऱ्या सराईत गुन्हेगारास पनवेल शहर पोलिसांनी ताब्यात घेवून त्याच्याकडून चोरीच्या दोन दुचाकी हस्तगत केल्या आहेत.

मोहिम लालवाणी यांची दुचाकी ही कर्नाळा भाजी मार्केट परिसरात उभी ठेवली असता अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची तक्रार पनवेल शहर पोलीस ठाण्यात त्यांनी केली होती. या तक्रारीच्या आधारे वपोनि नितीन ठाकरे यांच्या मार्गदर्शनाखालील पोलिसांच्या पथकाने तांत्रिक तपास व गुप्त बातमीदाराद्वारे आरोपीचा शोध सुरू केला असता त्यांना आरोपी अजयकुमार कौल (३० रा.करंजाडे) याची माहिती मिळाली. त्यानुसार त्याला ताब्यात घेवून त्याची अधिक चौकशी केली असता त्याने चोरलेल्या ५० हजार रुपये किंमतीच्या दोन दुचाकी वाहने पोलिसांनी हस्तगत केल्या आहेत. पुढील तपास पनवेल शहर पोलीस करीत आहेत.

## गहाळ झालेले १६ मोबाईल मालकांना परत

**मोहोपाडा : प्रतिनिधी**



रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीमध्ये गहाळ झालेले व चोरी झालेल्या मोबाईल फोनचा शोध रसायनी पोलिसांनी आलेल्या तक्रारीवरून घेतला असून प्रॉपर्टी मिसिंग मधील मोबाईल फोनचा सीईआयआर पोर्टलचा वापर करून मोबाईल फोन शोधून काढण्यास रसायनी पोलिसांना यश मिळाले आहे.

उपविभागीय पोलीस अधिकारी खालापूर यांच्या मार्गदर्शनाखाली व रसायनी पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक संजय बांगर यांच्या अथक प्रयत्नाने तसेच पोर्टलचे काम पाहणारे अंमलदार यांच्या परिश्रमाने रसायनी परिसरातील चोरीस व गहाळ झालेले १६ मोबाईल फोन मोबाईल धारकांना पोलीस ठाण्यात बोलावून व खातरजमा करून त्यांना परत करण्यात आले. याबद्दल मोबाईल धारकांनी रसायनी पोलीस ठाण्याचे आभार मानले.



**पनवेल :** ब्रम्हाकुमारी तारादिदी यांनी महिला व पुरुषांसाठी रक्षाबंधन कार्यक्रम हुतात्मा स्मारकात आयोजित केला होता. या वेळी महापालिकेच्या माजी महिला व बालकल्याण सभापती दर्शना भोईर, शहर सरचिटणीस सपना पाटील, अरुणा पाटील, आशा तळोजकर आदी उपस्थित होते.



**पनवेल :** रायगड जि.प. शाळा नौपाडा येथे समाजसेवक प्रदीप भगत कामोठे यांच्याकडून आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त एलईडी भेट देण्यात आली. या वेळी सुयोग वाफारे, चंद्रकांत सावंत, सुनील देसाई, नयन चौघुले, प्रथमेश सातपुते, साहील गुड, शाळेचे हेडमास्तर रवींद्र तांडेल आदी उपस्थित होते.

# खारघरमध्ये ज्येष्ठांना आयुष्मान भारत कार्डचे वाटप

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



आमदार प्रशांत ठाकूर यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त केलेल्या आवाहनानुसार भाजप खारघर मंडल उपाध्यक्ष किरण पाटील व माजी नगरसेविका नेत्रा पाटील यांनी खारघर येथील मनुस्मृति सीनियर सिटीजन होममधील नागरिकांना आयुष्मान भारत कार्डचे वाटप केले.

खारघर येथील मनुस्मृति सीनियर सिटीजन होममधील जेष्ठ नागरिकांना त्यांच्या आरोग्याच्या अथवा वैद्यकीय उपचारांसाठी महत्त्वाचे असलेले आयुष्मान भारत कार्ड हे आमदार प्रशांतदादा ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त भाजपा खारघर मंडल मा.उपाध्यक्ष किरण पाटील व नगरसेविका नेत्रा किरण पाटील यांच्या माध्यमातून दिनांक ५ ऑगस्ट मंगळवार रोजी संध्याकाळी वाटप करण्यात आले. आमदार प्रशांत दादांनी सांगितल्यानुसार त्यांचा वाढदिवस हा समाज हिताचे कार्यक्रम राबवून साजरा करण्यात आला.

या वेळी व्हिडिओ कॉलद्वारे आमदार प्रशांत ठाकूर यांच्याशी ज्येष्ठ नागरिकांनी संवाददेखील साधला. या वेळी जेष्ठ नागरिकांनी आमदार प्रशांत ठाकूर यांचे आभार मानत खऱ्या अर्थाने लोकप्रतिनिधींनी आपला वाढदिवस असाच समाज उपयोगी कार्यक्रमांनी साजरा करावा व एक आदर्श घालून द्यावा आपण खरंच एक आदर्श लोकप्रतिनिधी आहात, असेदेखील कटदरे यांनी सांगितले. उपस्थित सर्वच ज्येष्ठ नागरिकांनी आमदार प्रशांत दादांना वाढदिवसाच्या शुभेच्छा व आशीर्वाद दिले.

कार्यक्रमावेळी भाजपा युवा मोर्चा खारघर मंडल सचिव आदित्य हातगे, प्रभाग ४ युवा मोर्चा अध्यक्ष वैभव शेजवळ हे उपस्थित होते. दिनेश यादव व नितीन पाटील यांनी आयुष्मान कार्ड तयार करण्यासाठी मेहनत घेतली.



# पनवेलच्या शाळांमध्ये एक राखी सैनिकांसाठी उपक्रम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात १५ ऑगस्ट पर्यंत विविध उपक्रमांच्या माध्यमातून मोठ्या उत्साहात राबविली जात आहे. या अंतर्गत रक्षाबंधनाचे औचित्य साधून 'एक राखी सैनिकांसाठी' हा नाविन्यपूर्ण उपक्रम विविध शाळांमध्ये राबविण्यात आला.

शिक्षणाधिकारी रमेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महानगरपालिकेच्या शाळा क्रमांक पाच जीवन शिक्षण विद्यामंदिर मोठा खांदा तसेच रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडीयम स्कूल कामोठे येथे घेण्यात आला. सैनिकांच्या प्रति आदर व स्नेह व्यक्त करण्यासाठी तसेच त्यांच्या दीर्घायुष्यासाठी घरोघरी तिरंगा हर घर तिरंगा या उपक्रमांतर्गत शाळा क्रमांक पाच जीवन शिक्षण विद्यामंदिर मोठा खांदा शाळेतील व रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडीयम स्कूल सर्व विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी स्वतः राख्या तयार केल्या. या राख्या राजस्थान सीमेवरील सैनिकांना पालिकेच्यावतीने पाठविण्यात येणार आहेत.

मोठा खांदा मुख्याध्यापिका शोभा अवाड, रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडीयम स्कूल मुख्याध्यापिका स्वप्नाली म्हात्रे व सर्व शिक्षकांच्या मदतीने विद्यार्थ्यांनी या राख्या तयार केल्या. सदर उपक्रमास समन्वय उपक्रमशील शिक्षक ज्ञानेश रामचंद्र आलदर यांचे सहकार्य लाभले.

## खांदा कॉलनी येथे वृक्षारोपण

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

'सुंदर पनवेल, हरित पनवेल'या संकल्पनेखाली पनवेल महापालिकेच्या उद्यान विभागार्फत वृक्षारोपण मोहिम राबविण्यात येत आहे. प्रभाग समिती क कामोठे मार्फत बुधवारी महात्मा इंटरनॅशनल स्कूल, खांदा कॉलनी येथे उद्यान विभागामार्फत वृक्षारोपण करण्यात आले.

पर्यावरणाच्या संवर्धनासाठी आयुक्त मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे आणि उपायुक्त डॉ.वैभव विधाते यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपणाचा आणि नागरिकांना मोफत वृक्ष वाटपाचा कार्यक्रम पनवेल महानगरपालिका उद्यान विभागामार्फत सुरू आहे.

या कार्यक्रमांतर्गत महात्मा इंटरनॅशनल स्कूल सेक्टर ०८, खांदा कॉलनी येथे आवळा, जांभूळ, यासारखी फळझाडे व बेहडा, बहावा, अशोक अशा ५० वृक्षांची लागवड करण्यात आली. या वृक्षारोपण कार्यक्रमास महात्मा इंटरनॅशनल स्कूलचे प्राचार्य जोमन मॅथ्यू व इतर शिक्षकवृंद, शाळेचे विद्यार्थी उपस्थितीत होते.

सहा.आयुक्त डॉ. रूपाली माने व उद्यान विभागप्रमुख अनिल कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली उद्यान विभागातील उद्यान पर्यवेक्षक मांगीलाल जाधव व सहा.उद्यान पर्यवेक्षक कुणाल राठोड यांचे सहकार्य लाभले.



## पनवेल महापालिका मुख्यालयात तिरंगा प्रतिज्ञा

**पनवेल :** महानगरपालिकेमार्फत आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली 'घरोघरी तिरंगा– हर घर तिरंगा' मोहिम पनवेल महानगरपालिका क्षेत्रात १५ ऑगस्ट पर्यंत विविध उपक्रमांच्या माध्यमातून राबविली जात आहे. या मोहिमेंतर्गत महापालिका मुख्यालयात तिरंगा प्रतिज्ञा घेण्यात आली.



या वेळी परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे , उपायुक्त सर्वश्री डॉ.वैभव विधाते, प्रसेनजित कारलेकर, रवीकिरण घोडके मुख्य लेखा व वित्त अधिकारी मंगेश गावडे, मुख्य वैद्यकिय अधिकारी डॉ. आनंद गोसावी, मुख्य लेखा परिक्षक निलेश नलावडे, मुख्य जनसंपर्क अधिकारी डॉ. राजू पाटोदकर, पशुवैद्यकिय अधिकारी भगवान गीते, पालिका अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. महापालिका मुख्यालयाबरोबर केएलई महाविद्यालय, डी.डी विसपुते.रामशेठ ठाकूर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय खारघर अशा विविध महापालिका कार्यक्षेत्रातील शाळा व महाविद्यालयांमध्ये देखील तिरंगा प्रतिज्ञा घेण्यात आली.

## गुणवंत विद्यार्थ्यांचा गौरव

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल विधानसभा मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक उपक्रमांचा आयोजन गेल्या आठवडाभर करण्यात येत आहे. पनवेल तालुक्यातील तोंडरे रायगड जिल्हा परिषदेच्या शाळेत गुणवंत विद्यार्थ्यांचा गुणगौरव आणि बक्षीस वितरण सोहळ्याच्या आयोजन करण्यात आले होते. तोंडरे ग्रामपंचायतचे माजी सरपंच राम पाटील आणि श्री. रामशेठ पाटील सामाजिक विकास मंडळ यांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन गुरुवारी (दि.८) करण्यात आले होते.

या कार्यक्रमाला माजी सरपंच राम पाटील, माजी सरपंच टी.जी. पाटील, अशोक पाटील, ग्रामपंचायतीचे माजी सदस्य नारायण पाटील, नाथा पाटील पोलीस पाटील नामदेव पाटील, शिवराम पाटील, प्रल्हाद पाटील, संदीप पाटील, श्री रामशेठ पाटील सामाजिक विकास मंडळाचे अध्यक्ष हरीश पाटील, उपाध्यक्ष अरुण पाटील, सचिव धनाजी पाटील, खजिनदार वसंत पाटील, सदस्य लक्ष्मण पाटील, सदस्य सुभाष पाटील यांच्यासह विद्यार्थी आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## संपादकीय

# संयमाने उत्तर देणेच योग्य

अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी जाहीर केलेल्या दंडाच्या नव्या निर्णयानुसार भारत निर्यात करीत असलेल्या वस्तूंवर लवकरच अमेरिकेत पन्नास टक्के आयातशुल्काचा बोजा पडेल. याचा भारताच्या तेथील निर्यातीवर अर्थातच परिणाम होईल. पण तरीही अमेरिकेच्या दबावतंत्रासमोर न झुकता अमेरिकेसोबतचे परराष्ट्र व आर्थिक संबंध संयमानेच सुधारावे लागतील.

**परराष्ट्र संबंध हे दोन देशांमधील दीर्घकालीन नाते आणि परस्पर हित यावर अवलंबून असतात. पण अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प मात्र कोणत्याही संकेतांचे पालन न करता त्यांच्या मनाला वाटेल तसे वागत आहेत. गेला काही काळ ट्रम्प व्यापारनीती म्हणून आयातशुल्काचा वापर करत आहेत. याचाच भाग म्हणून ट्रम्प यांनी बुधवारी भारतावर २५ टक्के अतिरिक्त आयातशुल्क लादले. रशियाकडून तेलखरेदी करत असल्याबद्दल दंड म्हणून हे अतिरिक्त आयातशुल्क लादल्याचे सांगण्यात आले. या दंडाची घोषणा ट्रम्प यांनी आधीच केली होती. त्यामुळे हे अनपेक्षित नाही. आधी जाहीर केलेल्या २५ टक्के आयातशुल्काची अंमलबजावणी गुरुवारपासून सुरू झाली आहे. जगभरातच अमेरिकेकडून परस्परसमान कर गुरुवारपासून लागू झाले. भारतावरील अतिरिक्त २५ टक्के कराची अंमलबजावणी आदेश निघाल्यापासून २१ दिवसांनी केली जाणार आहे. त्यानुसार, सवलत दिलेल्या वस्तू व सेवा वगळता, भारतीय मालावर ५० टक्के शुल्क लागेल. ट्रम्प यांना शेती व दुग्धजन्य उत्पादने भारतात विकायची आहेत. त्यासाठी हवा असलेला व्यापार करार करण्यासाठी भारतावर दबाव वाढवण्याकरिता ट्रम्प यांनी हे पाऊल उचलल्याचे मानले जाते. रशियाकडून तेल घेऊ नये असे बजावूनही भारत तसे करणे थांबवत नाही. तसेच ट्रम्प यांनी भारताचे पाकिस्तानबरोबरचे युद्ध थांबवल्याचा दावा वारंवार करूनही भारताने त्यासंदर्भात अनुकूल प्रतिसाद दिला नाही. या साऱ्यामुळे ट्रम्प भारतावर नाराज झालेले दिसतात. भारतीय मालावर अमेरिकेत ५० टक्के शुल्क लादले गेले तर ते जगातले सर्वाधिक असेल. ट्रम्प यांनी भारतासोबतचे संबंध बिघडवू नयेत असा सल्ला त्यांना अन्य रिपब्लिकन नेते देत आहेत. परंतु ट्रम्प कोणाचेही ऐकत नाहीत. अमेरिकेने सध्या केवळ ब्राझीलवर ५० टक्के आयातकर लावला आहे. निर्यातीमध्ये भारताचे प्रतिस्पर्धी असलेल्या बांगलादेश, व्हिएतनाम यांच्या तुलनेत भारताला मोठी झळ सोसावी लागेल. पन्नास टक्के आयातशुल्कामुळे अमेरिकेतील भारताच्या औषधे, तयार कपडे आदी वस्तूंच्या निर्यातीवर परिणाम होऊ शकतो. रशियाकडून तेल खरेदी करणारा भारत काही एकमेव देश नव्हे. चीन व युरोपीय महासंघसुद्धा रशियाकडून इंधन घेत आहे. अमेरिका रशियाकडून युरेनियम, खते आदी गोष्टी आयात करते. असे असताना ट्रम्प यांनी रशियाकडून तेल खरेदी केल्याबद्दल भारताला लक्ष्य करण्यात कोणतीही तर्कसंगती नाही. यापूर्वी चिनी मालावर त्यांनी १४५ टक्के आयातशुल्क लागू केले. परंतु चीनने खमका पवित्रा घेतल्यावर ट्रम्प यांनी हे आयातशुल्क ३० टक्क्यांवर आणले. भारतानेही अमेरिकी मालावर ५० टक्के शुल्क आकारावे असा सल्ला दिला जातो आहे. परंतु ते तपासून पाहावे लागेल. लवकरच पंतप्रधान नरेंद्र मोदी शांघाय सहकार्य संघटनेच्या शिखर परिषदेसाठी चीन दौऱ्यावर जाण्याची शक्यता आहे. यावेळी मोदी व चीनचे अध्यक्ष क्षी जिनपिंग यांच्यात 'ट्रम्प टॅरिफ'वर चर्चा होण्याची शक्यता आहे. ट्रम्प यांच्या नाराजीमुळे उद्भवलेल्या या आव्हानावर भारताला सर्वांगीण विचार करूनच कृती करावी लागेल.**

# कोल्हापुरी चप्पल : देशी हस्तकलेचा अनमोल वारसा

भारतातील सर्वात जुन्या पारंपरिक हस्तकलांपैकी एक असलेल्या अशा कोल्हापुरी चपला आज पुन्हा एकदा प्रसिद्धीच्या वलयात येत आहेत. त्यांच्या वैशिष्ट्यपूर्ण कारागिरीचं आकर्षण महाराष्ट्रात आणि देशात आज कित्येक पिढ्या संपलेलं नाही आणि आता परदेशी बाजारपेठेतही त्या लक्ष वेधून घेत आहेत.

भारतातील अनेकानेक वैविध्यपूर्ण पारंपरिक हस्तकलांमध्येही, कोल्हापुरी चप्पल म्हणजे मानवी हातांचं कसब किती अनोखं असू शकतं याचं एक अस्सल उदाहरण आहे. तिला स्वतःची अशी एक खास सांस्कृतिक ओळख आहे. कोल्हापुरी चपलेचा प्रवास खरं तर मध्ययुगापासून चालत आलेला आहे. आत्ताच्या फॅशन-जगतातलं त्यांचं पदार्पण नवीन असलं तरी त्यामागे पिढ्यानुपिढ्या जतन केलेलं परंपरागत ज्ञान, कौशल्य आणि वर्षानुवर्षांचे संस्थात्मक प्रयत्न यांचा शेकडो वर्षांचा इतिहास आहे.

प्रामुख्याने कोल्हापूर, सांगली आणि सोलापूरमध्ये कोल्हापुरी चपलेचं उत्पादन होतं. या चपला बनवणाऱ्या कुटुंबांमध्ये पिढ्यानपिढ्या ती कला चालत आलेली आहे. नैसर्गिकरित्या कमावलेलं कातडं आणि वेणीसारखे गुंफलेले पट्टे वापरून बनवलं जाणारं हे चामड्याचं पादत्राण आपल्याकडे सुमारे बाराव्या शतकापासून बनवलं जात आहे. विसाव्या शतकाच्या सुरुवातीच्या दशकात या पुरातन हस्तव्यवसायाला एक महत्त्वपूर्ण ऐतिहासिक वळण मिळालं. कोल्हापूरचे द्रष्टे शासक छत्रपती राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांनी कोल्हापुरी चपलांच्या वापराला चालना द्यायचं ठरवलं



आणि व्यवसाय म्हणून त्यांचा दर्जा उंचावला. ओबडधोबड गावठी पायताण बनवणारे बलुतेदार पाहता पाहता राजाश्रय असलेले कारागीर झाले आणि त्यांनी घडवलेली पादत्राणं स्वदेशी अस्मितेचे प्रतीक बनली.

असा आपला हा मोलाचा सांस्कृतिक वारसा जतन करण्याच्या कामाची धुरा गेली अनेक दशकं सातत्याने आणि नेटाने वाहणारी सरकारी संस्था म्हणजे संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ, म्हणजेच लेदर इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र (LIDCOM²). चर्मोद्योग विकास महामंडळ कारागीरांना कौशल्यविकासाच्या संधी निर्माण करून देणं, परंपरेतील सातत्य आणि दर्जा राखणं, आणि दीर्घकाळ टिकाव धरू शकेल अशी व्यवसायाची आर्थिक बांधणी करणं ही धोरणं डोळ्यासमोर ठेवून वर्षानुवर्षे काम करीत आहे. १९७४मध्ये स्थापन झाल्यापासून महामंडळाने प्रशिक्षण देऊन, प्रयोगशीलतेला प्रोत्साहन देऊन, बाजारपेठांचा विस्तार करून आणि उपजीविकेचे मान सुधारून हजारो ग्रामीण कारागिरांना सबल बनवलं आहे.

**कारागिरांचे हितसंवर्धन, परंपरेची जपणूक**

चर्मोद्योगातील महामंडळाचा सहभाग केवळ आर्थिक मुद्द्यांपुरता मर्यादित नसून आपला सांस्कृतिक वारसा जाणीवपूर्वक जतन करण्यासाठीदेखील महामंडळ कटिबद्ध आहे. कोल्हापुरी चपलांच्या हस्तव्यवसायाचं पुनरुज्जीवन व्हावं, बदलत्या अर्थव्यवस्थेतही तो टिकून राहावा यासाठी महामंडळ अनेक आघाड्यांवर काम करतं. प्रशिक्षण केंद्रांचा विकास, स्वयं-विकास गटांचे सक्षमीकरण, अंतर्देशीय आणि आंतरर्देशीय बाजारपेठांदरम्यान खरेदीदार आणि पुरवठादार यांची साखळी निर्माण करणं अशा विचारपूर्वक आखलेल्या अनेक योजना महामंडळ राबवतं. महामंडळाच्या उद्दिष्टांविषयी बोलताना, व्यवस्थापकीय संचालक श्रीमती प्रेरणा देशभ्रतार (आयएएस) म्हणतात...

कोल्हापुरी चपला म्हणजे केवळ उपयुक्ततामूल्य असलेल्या वस्तू नसून त्यांच्यात स्वदेशाभिमान, स्वावलंबन आणि जिवापाड ज्यांचे रक्षण करावे अशा उज्ज्वल परंपरांच्या अनेक कथा दडलेल्या आहेत. आमच्या संस्थेच्या माध्यमातून आम्ही असा प्रयत्न करतो की हा सांस्कृतिक वारसा सदैव आमच्या कारागिरांचे हात अधिकाधिक बळकट करत राहील आणि भावी पिढ्यांना प्रेरणा देत राहील.

**अस्सलपणा आधुनिक अर्थव्यवस्थेत सुरक्षित करण्यासाठी भौगोलिक निर्देशांक असलेले ओळखचिन्ह**

कोल्हापुरी चपलांची कारागिरीची मूळ परंपरा जतन केली जावी आणि नफेखोरीसाठी त्यांची बाजारातील इतर उत्पादकांनी नक्कल करू नये याची खबरदारी घेण्याच्या दृष्टीने २०१९मध्ये महाराष्ट्र आणि कर्नाटकच्या चर्मोद्योग विकास महामंडळांनी एकत्रितपणे अर्ज करून (अर्ज क्रमांक १६९) भौगोलिक निर्देशांकाचं ओळखचिन्ह (Geographical Index Tag) मिळवलं. या जागतिक अर्थव्यवस्थेतील कायदेशीर तरतुदीमुळे अस्सल कोल्हापुरी चपला बनवण्याचे सर्व हक्क आता महाराष्ट्र आणि कर्नाटकमधील काही जिल्ह्यांसाठीच राखून ठेवले गेले आहेत.

TRIPSसारख्या बौद्धिक संपदेचे नियमन करणाऱ्या आंतरराष्ट्रीय व्यापार करारांतर्गत जी आय टॅगच्या तरतुदी सदस्य देशांना बंधनकारक आहेत. भौगोलिक निर्देशांकाचं ओळखचिन्ह किंवा GI टॅग प्रमाणपत्र या पादत्राणाची व्याख्या करताना कोणताही कृत्रिम कच्चा माल किंवा कोणतेही यंत्र न वापरता, पारंपरिक तंत्र वापरून हाताने बनवलेले, पायाची बोटे उघडी राहतील अशा रचनेचे आणि नैसर्गिकरित्या कमावलेल्या चामड्यापासून बनलेले असे त्याचे पैलू स्पष्ट करतं. हे प्रमाणपत्र कारागीरांची ओळख संरक्षित करण्यात आणि बाजारपेठेत विश्वासार्हता सिद्ध करण्यात महत्त्वाची भूमिका बजावतं.

**पारंपरिक हस्तकलेला तंत्रज्ञानाची जोड : अस्सल उत्पादनांसाठी QR कोड**

नक्कल रोखण्यासाठी आणि कारागीरांची ओळख अधोरेखित करण्यासाठी एक पुढचं पाऊल म्हणून, महामंडळाने कोल्हापुरी चपलेसाठी QR कोडेड प्रमाणीकरण सुरू केलं आहे. प्रत्येक जोड आता एका विशिष्ट कोडसहित येतो. त्या कोडवरून खालील माहिती मिळू शकते :

* कारागीर किंवा उत्पादन समूहाचं नाव आणि ठिकाण
* महाराष्ट्रातील त्या उत्पादनाचा जिल्हा
* त्यात वापरलेलं हस्तकलेचं तंत्र आणि साहित्य
* GI प्रमाणपत्राची वैधता-स्थिती

हा नवा डिजिटल उपक्रम खरेदीदारांचा विश्वास जिंकून घेत आहे आणि ही पारंपरिक उत्पादनं बनवणाऱ्या कारागिरांचं बाजारपेठेतील स्थान बळकट करत आहे.

कोल्हापुरी चप्पल आता नव्याने लोकप्रिय होत असताना, चर्मोद्योग विकास महामंडळ नागरिकांना, डिझायनर्सना आणि खरेदीदारांना आपल्या अस्सल मातीतल्या हस्तकला-परंपरा आणि त्या टिकवून ठेवणारे समाज यांच्या पाठीशी उभे रहाण्याचे आवाहन करत आहे. कोल्हापुरी चपला या केवळ फॅशन म्हणून वापरण्याच्या वस्तू नाहीत. परंपरागत हस्तकौशल्यं आणि छोट्या छोट्या समाजांची मूलभूत प्रतिष्ठा जपणाऱ्या आपल्या संस्कृतीची ती एक अजोड अभिव्यक्ती आहे.

**चर्मोद्योग विकास महामंडळाबद्दल...**

संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार विकास महामंडळ किंवा लेदर इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन ऑफ महाराष्ट्र (LIDCOM) ही संस्था म्हणजे पारंपरिक कारागिरांच्या हितसंवर्धनासाठी सुरू केलेल्या महाराष्ट्र शासनाच्या अनेक उपक्रमांपैकी एक आहे. चर्मोद्योग-क्षेत्राची प्रगती साधण्याच्या दृष्टीने या व्यवसायातील पारंपरिक कारागिरांचं हित जपणं, नवीन कल्पनांना आणि प्रयोगशीलतेला प्रोत्साहन देणं, बाजारपेठ विस्तारण्याचे मार्ग शोधणं आणि चर्मकार समाजाचा विकास साधणं ही संस्थेची उद्दिष्टं आहेत. ग्रामीण चर्मकारांसोबत केलेल्या कामातून कोल्हापुरी चप्पल हे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक इतिहासाचं आणि लोकाभिमुख अर्थकारणाचं एक ठळक बोधचिन्ह म्हणून पुन्हा लोकांपुढे आणण्यात महामंडळाने महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

**-राकेश बेड,**
**व्यवस्थापक, लिडकॉम**

## बदलते तंत्रज्ञान

# चॅटजीपीटी ५ लाँच; तज्ज्ञाप्रमाणे देणार उत्तर

ओपनएआयने गुरुवारी रात्री त्यांचे एआय मॉडेल चॅटजीपीटीचे पाचवे व्हर्जन अर्थात जीपीटी-५ लाँच केले. ओपनएआयचे सीईओ सॅम ऑल्टमन यांनी सांगितले की, जीपीटी ५ द्वारे वापरकर्त्यांनी विचारलेल्या प्रश्नांना तज्ज्ञांप्रमाणे उत्तरे दिली जातील. जीपीटी-५ हे नवे व्हर्जन अचूकता, वेग, तर्क आणि गणितीय क्षमतांमध्ये प्रगत असे असेल. तसेच लाँचिंग दरम्यान सॅम ऑल्टमन यांनी भारताचाही उल्लेख केला. भारत जागतिक स्तरावर एआयची सर्वात मोठी बाजारपेठ बनू शकेल, असे त्यांनी म्हटले.




दोन वर्षांपूर्वी जीपीटी-४ लाँच करण्यात आले होते. ओपनएआयच्या माहितीनुसार, जीपीटी-५ हे पूर्वीपेक्षा अधिक स्मार्ट, वेगवान आणि अधिक उपयुक्त असेल.

लाँचिंगनतर माध्यमांना माहिती देताना सॅम ऑल्टमन म्हणाले, भारत ही वेगाने वाढत जाणारी मोठी बाजारपेठ आहे. भारतातील लोक आणि व्यवसाय वेगाने एआच तंत्रज्ञान स्वीकारत आहेत. अमेरिकेनंतर भारत ही आमची दुसरी सर्वात मोठी बाजारपेठ आहे. पण भारतातील एआय वापरकर्ते त्याचा वापर कसा करतात, हे पाहणे महत्त्वाचे असणार आहे.

कोडिंग आणि ग्रेटिक टास्कसाठी जीपीटी-५ हे कंपनीचे आतापर्यंतचे सर्वात चांगले मॉडेल असल्याचेही कंपनीकडून सांगण्यात आले आहे. डेव्हलपर्सना चांगल्या पद्धतीने वापरता यावे, यासाठी जीपीटी-५, जीपीटी ५ मिनी आणि जीपीटी ५ नॅनो असे तीन वेगवेगळे प्रकार लाँच करण्यात आले आहेत. त्यांची कामगिरी, किंमत आणि वेग वेगवेगळा आहे.

सॅम ऑल्टमन पुढे म्हणाले की, जीपीटी ५ हे कृत्रिम बुद्धिमत्तेमधील मोठी झेप आहे. जीपीटी ५ ला तुम्ही काहीही प्रश्न विचारले तर त्यातून मिळणारे उत्तर हे एखाद्या तज्ज्ञाने दिल्यासारखे वाटेल. आम्ही वापरकर्त्यांना सुरुवातीला ही सुविधा मोफत उपलब्ध करून देत आहोत.

चॅटजीपीटी ५च्या लाँचमुळं ओपनएआयनं एआय तंत्रज्ञानात आणखी एक पाऊल पुढं टाकलं आहे. त्याच्या प्रगत वैशिष्ट्यांमुळं आणि वापरकर्ता-अनुकूल डिझाइनमुळं, हे मॉडेल लेखक, कोडर्स, आणि सामान्य वापरकर्त्यांसाठी एक शक्तिशाली साधन ठरेल. फ्री आणि पेड वापरकर्त्यांसाठी उपलब्ध असलेले हे मॉडेल, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या भविष्याला नवं दिशा देण्यास सज्ज आहे.

# मराठी रंगभूमीचे जनक विष्णूदास भावे

मराठी रंगभूमीचे जनक अशी विष्णू अमृत भावे (९ ऑगस्ट १८१९-ऑगस्ट १९०१) यांची ओळख राहिली आहे. सांगली संस्थानाचे अधिपती श्रीमंत चिंतामणराव ऊर्फ आप्पासाहेब पटवर्धन यांच्या खासगीकडे ते नोकर होते. कथा-कविता लिहिण्याचा नाद विष्णूदासांना होता.



## निमित्त


१८४२मध्ये कर्नाटकातून भागवत नावाची एक नाटकमंडळी सांगलीत आली होती. तिचे खेळ पाहिल्यानंतर तशा प्रकारचे नाट्यप्रयोग काही सुधारणा करून मराठीत केले, तर त्यांचे चांगले स्वागत होईल, अशी कल्पना आप्पासाहेबांच्या मनात आली व हे काम त्यांनी विष्णूदासांवर सोपविले. त्यानुसार विष्णूदासांनी १८४३मध्ये सीतास्वयंवर या स्वतःच रचिलेल्या नाटकाचा यशस्वी प्रयोग करून दाखविला. त्यानंतर रामायणातील विषयांवर दहा नाटके लिहून त्यांचे प्रयोग त्यांनी सांगली संस्थानात केले. तेही लोकप्रिय झाले. सूत्रधाराकडून मंगलाचरण, नंतर वनचरवेषधारी विदूषकाचा प्रवेश, त्याचे आणि सूत्रधाराचे विनोदी संभाषण, विघ्नहर्त्या गजाननाचे स्तवन, सरस्वतीस्तवन, गजानन व सरस्वती ह्यांचा आशीर्वाद प्राप्त झाल्यानंतर नाटकास प्रारंभ, अशी विष्णूदासांच्या नाट्यप्रयोगांची पद्धती होती. नाटकाच्या आरंभापासून त्याची अखेर होईपर्यंत सूत्रधारास काम असे. सादर होणाऱ्या नाट्यप्रसंगांचे वर्णन सूत्रधाराने पद्यातून केल्यानंतर संबंधित पात्रे रंगभूमीवर येऊन आपापली भाषणे करीत. सर्वच भाषणे आधी लिहिलेली नसत. नट स्वयंस्फूर्तीनेही तेथल्या तेथे प्रसंगोचित भाषणे करीत. नृत्य-गायनाला या नाटकांतून बराच वाव दिला जाई. नाटकातील प्रवेशाला 'कचेरी' असे नाव दिलेले होते. भावे यांनी पुढे महाभारतातील कथानकांवरही नाटके लिहिली. विष्णूदास नाटकांत पखवाजाची साथ प्रमुख असे. नाट्यप्रसंगाला अनुकूल असे कोमल, गंभीर वा तीव्र असे बोल पखवाजावर वाजविले जात असत. या पखवाजाच्या आवाजावरून या नाटकांना 'तागडथोम नाटके' असे म्हटले जाई तसेच त्यांतील राक्षसांच्या 'अलल् डुर्र' अशा डरकाळीमुळे 'अलल् डुर्र' नाटके असे त्यांना संबोधिले जात असे.

चिंतामणराव पटवर्धनांचे निधन झाल्यावर (१८५१) विष्णूदासांना सांगली संस्थानाकडून मदत मिळेनाशी झाली. त्यामुळे त्यांना नाट्यप्रयोगासाठी गावोगावी दौरे काढावे लागले. नाटककार, दिग्दर्शक, कपडेवाला, रंगवाला इ. सर्व काही विष्णूदास स्वतःच असत. १८६१पर्यंत ते नाट्यव्यवसायात होते. व्यवसायनिवृत्तीनंतरचे आयुष्य त्यांनी सांगली येथेच घालविले. तेथेच प्लेगचे त्यांचे निधन झाले.

भावे यांची नाटके बरीचशी पद्यमय होती आणि त्यातील पद्यरचनेचे, प्राचीन मराठी आख्यानकरचनेशी निकटचे नाते होते. त्यांच्या नाटकांसाठी त्यांनी विविध छंदात केलेल्या पद्यरचनांचा उल्लेख 'नाट्याख्याने' असाही करण्यात येतो. विष्णूदासी नाटकांचा मुख्य भाषारूप आधार म्हणजे ही पदेच होत. भावे यांची पन्नासांहून अधिक नाट्याख्याने नाट्यकवितासंग्रह (१८८५) या नावाने प्रसिद्ध झालेली आहेत. या नाट्याख्यानांना स्वरसाज चढविताना विविध रागरागिण्यांचा व त्यांच्या मिश्रणांचा विष्णूदासांनी प्रभावीपणे उपयोग करून घेतला होता. नाट्यप्रयोगाची एक निश्चित संकल्पना समोर ठेवून नाटक सादर करणारी पहिली नाटकमंडळी विष्णूदासांनी उभी केली.

**-अ.र. कुलकर्णी (मराठी विश्वकोष)**

## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# व्हायरसमुळे होतोय स्किन कॅन्सर

कॅन्सरचे वेगवेगळे प्रकार असतात. त्यातील जगभरातील एक सगळ्यात कॉमन प्रकार म्हणजे स्किन कॅन्सर म्हणजेच त्वचेचा कॅन्सर. साधारणपणे त्वचेचा कॅन्सर शरीराच्या अशा भागात होतो, जो भाग उन्हाच्या संपर्कात अधिक राहतो. उन्हाची नुकसानकारक किरणे स्किन कॅन्सरच्या सुरुवातीचं कारण मानली जातात. अशात अलिकडे वैज्ञानिकांना आढळलं की, आपल्या त्वचेवर राहणाऱ्या एका सामान्य व्हायरसमुळे स्किन कॅन्सर होतो. हा व्हायरस आधी इतका घातक समजला जात नव्हता. हा व्हायरस खासकरून इम्यूनिटी कमजोर असलेल्या व्यक्तींना शिकार बनवतो. हा व्हायरस आहे बीटा-एचपीव्ही, जो एचपीव्ही व्हायरसचा एक प्रकार आहे.



ह्यूमन पेपिलोमा व्हायरस जगातील सगळ्यात कॉमन व्हायरसपैकी एक आहे. याचे जवळपास २०० प्रकार आहेत. बीटा-एचपीव्ही त्यातील एक आहे. ज्याचा आतापर्यंत स्किन कॅन्सरसोबत थेट संबंध जोडण्यात आला नव्हता. मात्र, नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थच्या वैज्ञानिकांना या गोष्टीचे पुरावे मिळाले आहेत की, हा सामान्य बीटा-एचपीव्ही व्हायरस स्किन कॅन्सरचं कारण बनू शकतो.

एका महिलेवर उपचार करत असताना या शोध लावण्यात आला. महिलेला स्क्वॅमस सेल कार्सिनोमा नावाचा स्किन कॅन्सर झाला होता. अनेक उपाय करूनही कॅन्सर पुन्हा होत होता. महिलेची स्किन सूर्यकिरणांमुळे होणाऱ्या नुकसानपासून रिपेअर होत नाहीये आणि तिची कमजोर इम्यूनिटी व्हायरसला नियंत्रित करू शकत नाहीये, पण नंतर वेगळंच कारण समोर आलं.

डॉक्टरांना आढळून आलं की, बीटा-एचपीव्ही व्हायरस महिलेच्या स्किन सेल्सच्या डीएनएमध्ये शिरला होता आणि व्हायरल प्रोटीन बनवत होता. याचा अर्थ होता की, त्वचेच्या कोशिकांना पूर्णपणे आपल्या ताब्यात घेतलं होतं.

ज्या महिलेमुळे वैज्ञानिकांना हा शोध लावता आला त्या महिलेची इम्यूनिटी कमजोर होती, ज्यामुळे महिलेचे टी सेल्स योग्यपणे काम करत नव्हते. त्यामुळे व्हायरस लढण्याची क्षमता कमी झाली होती. व्हायरस शरीरात प्रोटीन बनवत होतं आणि कॅन्सर पुन्हा पुन्हा परत येत होता. महिलेवर वेगळ्या पद्धतीने उपचार करण्यात आले आणि व तिच्या कॅन्सर परत आला नाही. या घटनेतून समोर आलं की, कमजोर इम्यून सिस्टीम असलेल्या लोकांमध्ये बीटा-एचपीव्ही व्हायरस त्वचेच्या कोशिका ताब्यात घेऊन स्किन कॅन्सरचं कारण बनू शकतो.

# पोलादपुरात सहा लाखांचा गोवा बनावटीचा दारूसाठा जप्त

**पोलादपूर : प्रतिनिधी**

तालुक्यातील गोवा बनावटीच्या दारूसाठयाची आवक नुकतीच छापा मारून राज्य उत्पादन शुल्क विभागाने उघडकीस आणली आहे. मात्र, यापूर्वी दिविल गावातील एका अवैध दारूतस्करी करणाऱ्याचा मृत्यूचा दाखला गोवा राज्यातील कोर्टात पाठवून सहकार्य करण्यात आल्याची चर्चा यानिमित्ताने सुरू झाली आहे.



राज्य उत्पादन शुल्क विभागाची कारवाई

गुप्त माहितीच्या आधारे भरारी पथक अलिबाग व राज्य उत्पादन शुल्क विभाग महाड यांनी पोलादपूर तालुक्यातील दिवील या ठिकाणी छापा टाकला असता बंद घरामध्ये सुमारे गोवा बनावटीचे ५६ बॉक्स विदेशी दारूच्या बाटल्या आढळून आल्या आहेत. या गुन्ह्यातील आरोपी रुपेश मोरे (रा. दिवील,ता.पोलादपूर) याला राज्य उत्पादन शुल्क विभागाने ताब्यात घेतले असून दोन आरोपी फरार असल्याची माहिती मिळाली आहे. या कारवाईत सुमारे सहा लाख रुपये किमतीचा गोवा बनावट विदेशी दारू राज्य उत्पादन शुल्क विभागाने जप्त केली आहे.

या कारवाईमध्ये राज्य उत्पादन शुल्क आयुक्त राजेश देशमुख, राज्य उत्पादन शुल्क संचालक प्रसाद सुर्वे, अधीक्षक रविकिरण कोल्हे, विभागीय आयुक्त प्रदीप पवार यांच्या आदेशाने राज्य उत्पादन शुल्क निरीक्षक सतीश गावडे, दुय्यम निरीक्षक रश्मीन समेळ, प्रसाद दाते, सहाय्यक दुय्यम निरीक्षक श्रीमती पोकळे, निलेश नाईक, जवान रिंकेश धुळे, कल्याणी ठाकूर, रचना मोहिते, सुनील घन, रणजीत माकोडे यांचा यशस्वी सहभाग होतान

पोलादपूर तालुक्यात गेल्या काही वर्षांपासून दिवील येथील गोवा बनावटीच्या दारूच्या बाटल्या तस्करी करून आणून मोठया प्रमाणात विक्री करणाऱ्या तरूणासाठी स्थानिक स्वराज्य संस्थेपैकी ग्रामपंचायत या यंत्रणेच्या सहकार्याबाबत विलक्षण चर्चा असून एका आरोपीविरूध्द गोवा राज्यातील न्यायालयामध्ये हजर राहणे टाळण्यासाठी एका बनावट दारूची तस्करी करताना अटक झालेल्या तरूणास चक्क मृत्यूचा दाखला देऊन सहकार्य करण्यात आले असल्याचे ग्रामस्थांकडून सांगण्यात आले. पोलादपूर तालुक्यात यानिमित्ताने 'आपलंच पोर' अशा प्रेमभावनेतून अनेक गुन्हेगारांना राजकीय प्रशासकीय सहकार्याची भावना असल्याचे स्पष्ट झाले आहे.

## निवडक

### नागोठणे पोलिसांना 'दक्षता'ची राखी



**नागोठणे :** पोलीस बांधव हे समाजाचे रक्षण अहोरात्र करत असतात. त्यांना कुठलाही सणवार असो आपल कर्तव्य पार पाडाव लागत. कोणताही सण उत्सव असो समाजात कोणतंही तेढ निर्माण होऊ नये यासाठी कायदा व सुवेवस्था अबाधित राखण्यासाठी झटत असतात. त्यांच्या त्यागाच्या व कर्तव्याच्या भावनेला जाणून नागोठणे महिला दक्षता समितीच्या वतीने ७ ऑगस्ट रोजी नागोठणे पोलीस ठाण्यात पोलीस बांधवांना राखी बांधण्यात आली. या वेळी उपविभागीय पोलीस अधिकारी रवींद्र दौंडकर, नागोठणे पोलीस ठाण्याचे सहाय्य्क पोलीस निरीक्षक सचिन कुलकर्णी, दक्षता समितीच्या दर्शना जवके, सुजाताजवके, कल्पना टक्के, निलोफर पानसरे, शबाना मुल्ला, अपर्णा सुटे, मंजुळा म्हात्रे, डॉ. कांचन शेळके, संगीता पोलिसांनी, नंदा गायकवाड यांसह पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

### आदिवासी दिनानिमित्त आज कार्यक्रम

**चौक :** तालुक्यातील आदिवासी बांधव ९ ऑगस्ट रोजी संपूर्ण खालापूर तालुक्यात साजरा करणार असून विविध सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. आदिवासी बांधव यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. आदिवासी दिवस दरवर्षी ९ ऑगस्ट रोजी जगभरात साजरा केला जातो. सकाळी ८.३० वाजता मुंबई पुणे रस्त्यावर चौक फाटा येथे सर्वांनी उपस्थित रहावे, असे आवाहन सचिव दिलीप डाके यांनी केले आहे.

### खोपोलीत रक्तगट तपासणी

**खोपोली :** रोटरी क्लब खोपोलीतर्फे सह्याद्री विद्यालय खोपोली शीळफाटा या शाळेतील १९० विद्यार्थ्यांचे रक्तगट तपासणी मोफतमधे करण्यात आले. रोटरी क्लब खोपोलीतर्फे सह्याद्री विद्यालय खोपोली फाटा या शाळेतील १९० विद्यार्थ्यांचे रक्त गट तपासणी डॉ. रवींद्र टिळक यांच्या मिहीर हॉस्पिटलच्या स्टाफने काम पाहिले. या वेळी रोटरी क्लब खोपोलीच्या अध्यक्ष सुनीता चव्हाण, सेक्रेटरी डॉ नलिनी रामस्वामी, सुरेश खेडकर, निधी मॅडम, शाळेचे मुख्याध्यापक हेमंत खाडे, शालेय समितीचे अध्यक्ष संजय पाटील व इतर स्टाफ उपस्थित होते.




## खोपोलीत १३ लाखांची चोरी

**खालापूर : प्रतिनिधी**

खोपोलीतील शिळफाटा डीसी नगर मधील द्वारका अपार्टमेंटमधील बी विंग पहीला माळा चोरट्यांनी दरवाजाचे लॉक तोडून घरात प्रवेश केला. कापाटातील सोन्याचे गंठन हार, झुमके, चेन अंगठया असे १९ तोळे सोने आणि चांदीचे दागिने असे एकूण रक्कम १२ लाख ७३ हजार रुपयांचा माल घेऊन पलायन केले.

घटनेची माहिती मिळताच खोपोली पोलिसांनी दाखल होऊन पाहणी केली. उपविभागीय पोलिस अधिकारी विशाल नेहल पाटील व खोपोली पोलीस निरीक्षक सचिन हिरे व सहकारी अधिकारी व पोलीस कर्मचारी यांनी घटनास्थळी भेट देऊन श्वानपथकाला पाचारण केले. दरम्यान जगदीश परमार अंकित परमार या दोन्ही भावंडांचे बाजूबाजूलाच या ठिकाणी ब्लॉक आहे. घरात कार्यक्रम असल्याने एकाच घरात सर्व मंडळी झोपी गेली, आणि या संधीचा फायदा घेऊन चोरट्यांनी रूमचे लॉक तोडून प्रवेश केला.

# निजामपूर बसस्थानकात अपघातांची मालिका

**माणगाव : बातमीदार**

एकापाठोपाठ एक अपघाताची मालिका सुरू असलेल्या माणगाव दिघी मार्गावरील रहदारीचे स्थानक असलेल्या निजामपूर बस स्थानकात नेहमीच होणाऱ्या वाहतुकीच्या कोंडीमुळे अपघाताचे प्रमाण वाढले असून एकापाठोपाठ एक अपघाताची मालिका सुरूच असून ४ ऑगस्ट २५ रोजी पुण्याकडून येणाऱ्या कारणे बस स्टँड वर उभा असणाऱ्या प्रवाशास आणि एक विद्यार्थिनी तसेच दोन रिक्षा नाही ठोकर देऊन मोठा अपघात घडला असून अपघातात एकाचा मृत्यू झाला आहे तर विद्यार्थिनी जखमी अवस्थेत तिच्यावर उपचार सुरू आहेत.



निजामपूर बस स्थानकासमोरील दिघी पुणे महामार्गाच्या दोन्ही बाजूने रिक्षा स्टॅन्ड आणि बेजबाबदारपणे होणारी पार्किंग यामुळे या ठिकाणी नेहमीच वाहतूक कोंडी होत असते. याबाबत अनेक वेळा स्थानिकांनी वृत्तपत्रातून आवाज उठूनही यावर तोडगा निघाला नाही. त्यामुळे दिवसेंदिवस वाहतूक कोंडीचे प्रमाण वाढले असून एकापाठोपाठ एक अपघाताची मालिका सुरूच आहे, अनेक वेळा या ठिकाणी वाहन चालकांचे वाद होऊन भानगडी सुद्धा झालेले आहेत. मात्र संबंधित प्रशासनाचे याकडे कानाडोला असून दिवसेंदिवस हा प्रमाण वाढलेला आहे. सुट्टीच्या काळात तर हा प्रमाण इतका भयंकर असतो की निजामपूर बस स्थानक हे वाहतूक कोंडीचे आगार मानले जाते. अशा भयानक अवस्थेमुळे दिनांक ४ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी सात आठच्या दरम्यान पुण्याकडून माणगाव कडे जाणारी बलोनो कारने बस स्टैंड वर उभा असणाऱ्या प्रवाशाला आणि एका विद्यार्थिनीला ठोकर देऊन तसेच दोन रिक्षांना ठोकर देऊन येथे मोठा अपघात घडला.

या अपघातात सलीम महमद चाफेकर, यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला तर, विद्यार्थिनी प्रगती बबन सुतार ही जखमी झाली असून तिच्यावर उपचार सुरू आहेत तसेच बस स्टैंड वर उभा असणाऱ्या दोन रिक्षा नाही ठोकर देण्यात येऊन त्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. असे प्रकार नेहमीच या ठिकाणी घडत असून निजामपूर बस स्थानकावर असणाऱ्या दोन्ही बाजूच्या रिक्षा स्टॅन्ड आणि पार्किंगमुळे तसेच एम एच १२ आणि एम एच १४ पासिंगच्या पुण्याकडून येणाऱ्या वाहनांची बेजबाबदारपणे असणारी ड्रायव्हिंग यामुळे या ठिकाणी नेहमीच वाद-विवाद, हाणामारी आणि जीवघेणे अपघात घडत असतात, मात्र अनेक वेळा स्थानिकांनी आवाज उठवूनहीं याकडे दुर्लक्ष केले जात असून संबंधितानी याकडे वेळीच लक्ष देऊन भविष्यातील धोके टाळावे, अशी मागणी सर्व स्तरातून होत आहे.

# रेवदंडा येथे दहीहंडी सराव शिबिर उत्साहात

### जय भवानी खारगाव कोळीवाडा संघ प्रथम

**रेवदंडा : प्रतिनिधी**

अलिबाग व मुरूड तालुक्यातील पुरूष गोंविदा पथकांसाठी शिवसेना पुरस्कृत श्री भैरवनाथ मित्र मंडळ, रेवदंडा आयोजीत दहिहंडी सराव शिबीर २०२५ उत्साहात संपन्न झाला. या सराव शिबीरात जय भवानी खारगांव कोळीवाडा प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला तर अलिबाग कोळीवाडा-व्दितीय, जय हनुमान भोनंग-तृतीय क्रमांकांचे विजेते ठरले.



रेवदंडा गोळा स्टॉप नजीक हरेश्वर मंदिराचे पटागंणात गुरूवार ७ ऑगस्ट २०२५ रोजी सायकांळी सहा वाजता श्री भैरवनाथ मित्रमंडळ रेवदंडा यांचे वतीने शिवसेना पुरस्कृत दहीहंडी सराव शिबिर २०२५ प्रारंभ झाला. या सराव शिबिरावेळी आमदार महेंद्र दळवी, शिवसेना नेते दिलिपशेठ भोईर उर्फ थोटमं शेठ, शिवसेना जिल्हा प्रमुख राजा केणी, चौल रा.कॉ. चे प्रविण राउत, सचिन राउळ, रेवदंडा सरपंच प्रफुल्ल मोरे आदी मान्यवरांची उपस्थिती होती. या सराव शिबीरात अलिबाग, मुरूड व रोहा तालुक्यातील २५ गोविंदा पथकाने सहभाग घेतला होता.

या स्पर्धेतील प्रथम क्रमाकांचे विजेत्यास रूपये १ लाख व भव्य चषक, व्दितीय क्रमांकास रूपये ७५ हजार व भव्य चषक, तृतीय क्रमांकास रूपये ५० हजार व भव्य चषक, तसेच पाच थराच्या सलामीस रूपये चार हजार १११/- असे भव्य बक्षिसे शिवसेना नेते दिलिपशेठ भोईर, सरपंच प्रफुल्ल मोरे आदीच्या हस्ते वितरीत करण्यात आली.

गोविंदा सराव शिबिर यशस्वीपणे पार पाडण्यासाठी भैरवनाथ मित्रमंडळ, रेवदंडा सर्व सदस्य यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन तसेच स्पर्धेचे धावते वर्णन संजय पोईलकर यांनी केले.

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येत आहे की, मौजे देवन्हावे, ता. खालापूर, जि. रायगड येथील मधुकर विश्वनाथ बेंदरे यांचे नावे असलेली, ताबेकब्जातील तसेच मालकी हक्काची, खुद्द स्वरूपाची खालील वर्णनाची शेतजमिन व बिनशेती मिळकत आमचे आशिलांनी मालकी हक्काचे पडताळणी करून खरेदीखताने विकत घेण्याच्या विचारात आहेत.

**शेतजमिन/बिनशेती वर्णन**

**मौजे देवन्हावे, तालुका. खालापूर, जि. रायगड.**

| कब्जेदाराचे नाव | गट नं./ सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| मधुकर विश्वनाथ बेंदरे | ४६ | ४/अ/१ | ०-४८-४० पो.ख.०-०४-१३ **०-५२-५३** | ६.६९ |
| | ४६ | ४/अ/२ | ४-४७-०० चौ.मी. (बिनशेती मिळकत) | ४४.७० |

सबब वर नमुद शेतजमिन/बिनशेती मिळकतीवर, वा मिळकतीच्या कोणत्याही भागावर अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बोजा, बक्षीस, चार्ज, अॅटचमेंट, लीज एम.ओ.यु. वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झालेपासून १४ दिवसाच्या आत हक्क हितसंबंधाचे स्वरूप विषेद करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्यावर लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अगर समक्ष येवून भेटावे वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत तक्रार, दावा वगैरे न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित असून त्यावर कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार, दावा हितसंबंध नाही असे समजून आमचे आशिल सदर वर नमुद मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारची हरकती, तक्रारी दावे आमचे आशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्यासोडून दिल्या आहेत असे गृहित धरले जाईल, याची तमाम लोकांनी/नागरिकांनी कृपया नोंद घ्यावी

**दिनांक : ०८/०८/२०२५**

**सही/-**
**अॅड विजय भगत अॅन्ड असोशिएटस्**
(अॅडव्होकेट अॅन्ड लिगल कन्सलटंट)
शॉप नं. १२८, नगरपालीका शॉपींग कॉम्पलेक्स,
पनवेल, ता. पनवेल, जि. रायगड.
मो.९८२०६०७५७२/९३२२६५२३१९
Email.vijaybhagat43@gmail.com

## उप विभागीय अधिकारी, पनवेल यांचे कार्यालय,

**भुमिसंपादन पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम २०१३ अंतर्गत**

**कलम १९ ची अधिसुचना**

याअर्थी, समुचित शासन असलेल्या रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिका-याने, भुमिसंपादन, पुनर्वसन व पुनर्वसाहत करताना उचित भरपाई मिळण्याचा आणि पारदर्शकतेचा हक्क अधिनियम, २०१३ (२०१३ चा ३०) (यात यापुढे ज्याचा निर्देश ''उक्त अधिनियम'' असा केला आहे) यांच्या कलम १३ च्या पोट कलम (१) व्दारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, अधिसूचना दिनांक १५/०५/२०२५ अन्वये कलम ११ ची अधिसुचना प्रसिध्द केली आहे. आणि त्याव्दारे असे अधिसुचित केले आहे की, यासोबत जोडलेली अधिसूची एक मध्ये अधिक तपशीलवार वर्णन केलल्या जमिनीची, अनुसूची दोन मध्ये अधिक तपशीलवार विनिर्दिष्ट केलेल्या सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहे किंवा तिची आवश्यकता भासण्याची शक्यता आहे;

आणि ज्याअर्थी, रायगड जिल्ह्याच्या जिल्हाधिकाऱ्याने, कलम १५ च्या पोटकलम (२) अन्वये दिलेला अहवाल. कोणताही असल्यास, विचारात घेतल्यानंतर उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिन संपादीत करण्याची आवश्यकता आहे याबाचत त्याची खात्री पटली आहे; आणि म्हणून, उक्त अधिनियमाच्या कलम १९ च्या पोटकलम (१) च्या तरतुदीन्चये, उक्त सार्वजनिक प्रयोजनासाठी उक्त जमिनीची आवश्यकता आहे असे याव्दारे घोषित करण्यात येत आहे.

आणि ज्याअर्थी, अनुसूची तीन मध्ये अधिक तपशिलवार वर्णन केलेले क्षेत्र हे बाधित कुटुंबियांच्या पुनर्वसन व पुनर्वसाहतीच्या प्रयोजनासाठी ''पुनर्वसाहत क्षेत्र'' म्हणून निर्धारित केले असल्याचे याद्वारे घोषित केले जात असून, पुनर्वसन व पुनर्वसाहत योजनेचा सारांश अनुसूची चार मध्ये विनिर्दिष्ट केला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम ३ च्या खंड (ग) अन्वये, समुचित शासन असलेला जिल्हाधिकारी, उक्त अधिनियमान्वये जिल्हाधिकाऱ्याची कार्ये णर पाडण्यासाठी उप विभागीय अधिकारी, पनवेल यास पदनिर्देशित करीत आहे.

**अनुसूची-एक**
**जमिनीचे वर्णन**
**गाव- जुई, तालुका-उरण, जिल्हा-रायगड**

| Sr.No. | Survey No. | area in H.R. |
|---|---|---|
| १ | ११०/० P. | ०.२९.७० |
| | Total | ०.२९.७० |

**अनुसूची-दोन**
**सार्वजनिक प्रयोजनाच्या स्वरुपाबाबत विवरण**
**अधिसूचना प्रकल्पाचे नाव**

**अधिसूचना :- प्रकल्पाचे नाव : -** उरण तालुक्यातील मौजे जुई, क्षेत्र ०.२९.७० हे.आर. उरण-उसर प्रोपेन पाईप लाईनच्या एस. व्ही. स्टेशन (Sectionalizing Valve Station) च्या बांधकामसाठी भूसंपादन करणेकामी प्रयोजन.

**निर्गमित :- प्रकल्प कार्याचे वर्णन :** उरण तालुक्यातील मौजे-जुई, क्षेत्र ०.२९.७० हे. आर. उरण-उसर प्रोपेन पाईप लाईनच्या एस. व्ही. स्टेशन (Sectionalizing Valve Station) च्या बांधकामासाठी भूसंपादन करणेसाठी आवश्यक आहे.

**करण्यापूर्वी :- समाजाला मिळणारे लाभा** उरण तालुक्यातील औद्योगिक महत्व व नागरीकरण तसेच विकास आणि विस्तार वेगाने होत असल्याने प्रस्तावित करण्यांत आलेले क्षेत्र संपादन केलेखेरीज समाजाची उन्नती होऊ शकणार नाही. त्यामुळे उरण-उसर प्रोपेन पाईप लाईनच्या एस. व्ही. स्टेशन (Sectionalizing Valve Station) चे बांधकाम करणे आवश्यक आहे.

**अनुसूची-तीन**

**बाधित व्यक्तीचे विस्थापन करण्यास भाग :- पाडणारी कारणे** निरंक

**अनुसूची-चार**

**सामाजिक प्रभाव निर्धारणाचा सारांश:-** उरण तालुक्यातील मौजे-जुई, क्षेत्र ०.२९.७० हे.आर. भूसंपादन करणेसाठी आवश्यक आहे. ही जमिन संपादन करण्यामुळे केवळ १ खातेदार बाधीत होत आहे व खातेदार विस्थापित होत नाही. उरण तालुक्याचे औद्योगिक महत्व व नागरीकरण तसेच विकास आणि विस्तार वेगाने होत असल्याने प्रस्तावित करण्यांत आलेले क्षेत्र संपादन केलेखेरीज समाजाची उन्नती होऊ शकणार नाही. त्यामुळे उरण-उसर प्रोपेन पाईप लाईनच्या एस. व्ही. स्टेशन (Sectionalizing Valve Station) चे बांधकाम करणे आवश्यक आहे. त्यामुळे सार्वजनिक हितासाठी भूसंपादन अधिनियम २०१३ कलम ९ व ४० मधील तरतुदींनुसार सामाजिक परिणाम निर्धारणास
या कायदयाचे कलम १० नुसार सुट देण्यात आली आहे. याबाबतची अधिसुचना शासन राजपत्रात (असाधारण भाग चार-अ) मध्ये क्र.एसआयए-२०२४/प्र.क्र.३१२/अ-२, दिनांक ६ मार्च २०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे.

**सही/-**
**(पवन चाडक)**
**उप विभागीय अधिकारी पनवेल**
**उप विभाग पनवेल**

**ठिकाण :- पनवेल**
**दिनांक :- ०१/०८/२०२५**

**क्र. जिमाका राअ/जाहि/१२३/२०२५-२०२६**

# दहीहंडीनिमित्त उरण पोलीस ठाण्यात बैठक

**उरण : प्रतिनिधी**

दहीहंडी उत्सवाच्या निमित्ताने बंदर विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त किशोर गायके यांच्या उपस्थितीत उरण पोलीस ठाणे येथे बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीला उरण पोलीस ठाणे हद्दीतील सार्वजनिक दहीहंडी उत्सव मंडळाचे पदाधिकारी व सदस्य तसेच हद्दीतील पोलीस पाटील उपस्थित होते. यावेळी सार्वजनिक दहीहंडी उत्सव मंडळाचे पदाधिकारी व पोलीस पाटील यांना विशेष सूचना देण्यात आल्या.



यामध्ये सर्व मंडळांनी धर्मादाय आयुक्तांकडे दहीहंडी उत्सव मंडळाची नोंदणी करावी. जागा मालक नगरपरिषद, ग्रामपंचायत व संबंधित जागा मालकांची परवानगी घ्यावी. तात्पुरते विद्युत कनेक्शन घ्यावे. दहीहंडीच्या ठिकाणी स्टेज मजबूत असावे, याबाबत तज्ञ अथवा सार्वजनिक बांधकाम विभागाचे अभियंता यांच्याकडून तपासणी करून घ्यावी. दहीहंडीचे थर कमीत कमी लावण्यात यावे. ध्वनी प्रदूषण संदर्भात उच्च न्यायालयाने दिलेल्या सूचनांचे तंतोतंत पालन करावे. कार्यक्रम दरम्यान रहदारीस अडथळा किंवा आजु बाजूच्या लोकांना त्रास होणार नाही, याची खबरदारी घेण्यात यावी.

सर्व संबंधित विभागाच्या परवानग्या घेणे बंधनकारक आहे. मंडळाच्या ठिकाणी सुरक्षा रक्षक किंवा स्वयंसेवक नेमावे.प्रत्येक मंडळाने गोविंद पथकाचा आरोग्य विमा काढणे गरजेचे आहे. प्रथमोपचार साहित्य व डॉक्टर यांचेसह म्बुलन्सची व्यवस्था ठेवण्यात यावी. लहान मुलांना तीन थराच्या वरती दहीहंडी फोडण्यासाठी सामील करू नये, तसेच त्यांच्या सुरक्षिततेबाबत दक्षता घ्यावी, शेवटच्या थरावरील गोविंदास सेफ्टी बेल्ट वापरण्यात यावा. सर्व गोविंदा पथकाच्या सदस्यांचे इन्शुरन्स काढण्यात यावे, अशा महत्वाच्या सूचना सदरच्या बैठकीत देण्यात आल्या.

या वेळी उरणचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ, तसेच पोलिस निरिक्षक (गुन्हे) काटवाणी यांच्यासह बहुतांशी दहीहंडी मंडळाचे पदाधिकारी व सदस्य तसेच गावोगावचे पोलीस पाटील उपस्थित होते.

# चिरनेर गावात सांडपाणी वाहून नेणाऱ्या गटारांची कामे

**चिरनेर : रामप्रहर वृत्त**

उरण तालुक्यातील चिरनेर गावात सांडपाणी वाहून नेण्यासाठी भुयारी गटारांचे काम युद्ध पातळीवर सुरू आहे. शासनाच्या १५व्या वित्त आयोगाच्या निधीतून ही कामे सुरू आहेत.

चिरनेर गावात सात पाडे असून, गावात सांडपाणी वाहून नेणाऱ्या गटारांची व्यवस्था मागील काही वर्षांपूर्वीच करण्यात आलेली आहे, मात्र मधीलपाडा, कुंभार पाडा, मुळपाडा, खारपाटीलआळी साईनगर कातळपाडा तसेच गावातील अन्य भागात बांधण्यात आलेल्या भुयारी गटारांमधून सांडपाण्याचा व्यवस्थितरित्या निचरा होत नसल्यामुळे हे गटाराचे सांडपाणी रस्त्यावर येत असल्यामुळे, नागरिकांना दुर्गंधीचा त्रास सहन करावा लागत असे. ही बाब लक्षात घेऊन, या भुयारी गटारांच्या कामाकडे जाणीवपूर्वक लक्ष देऊन, मोठ्या व्यासाची पाईपलाईन गटारे बांधण्याच्या कामाला सुरुवात केली आहे.



# उरण महाविद्यालयात फूड फेस्टिवल रंगला

**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयात अ जीवन अध्ययन व निरंतर शिक्षण विभागाच्या वतीने फूड फेस्टिवल महोत्सवाचे आयोजन केले गेले.

कार्यक्रमात महाविद्यालय विकास समितीचे सदस्य मा. रमेश ठाकूर, पेडणेकर साहेब, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाल्मीक गर्जे इत्यादी मान्यवरांच्या हस्ते फूड फेस्टिवलचे उद्घाटन केले गेले. या वेळी बोलताना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाल्मीक गर्जे यांनी विद्यार्थ्यांनी व्यवहारातील लेखाजोखा मांडण्याची कला आपल्याला शिकता आली पाहिजे, असे सांगितले.

अजीवन अध्ययन व निरंतर शिक्षण विस्तार विभागाचे समन्वयक प्रा.व्हि.एस. इंदुलकर यांनी प्रास्ताविक केले व महोत्सव आयोजनामाचा उद्देश सांगितला. उद्घाटनीय सूत्रसंचालन प्रा. हन्नत शेख यांनी केले. या महोत्सवात विद्यार्थ्यांनी पाणीपुरी व दहीपुरी, व्हेज नॉनव्हेज कटलेट, तेज आलू व चायनीज समोसा, कप केक व पावभाजी, कोल्ड सँडविच कोल्ड कॉफी व फ्रुट कस्टर्ड, व्हेज स्प्रिंगरोल, सोया कबाब व चायना ग्रोस इत्यादी विविध प्रकारच्या खाद्यपदार्थाचे स्टॉल लावले होते.



# 'सीकेटी'त अकरावीच्या विद्यार्थ्यांचा प्रवेशोत्सव





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेच्या खांदा कॉलनीमधील चांगू काना ठाकूर (सीकेटी) उच्च माध्यमिक विद्यालयात ७ ऑगस्ट रोजी बारावीच्या विद्यार्थ्यांकडून अकरावी कला वाणिज्य व विज्ञान शाखेतील विद्यार्थ्यांचे अतिशय उत्साहात स्वागत करण्यात आले.

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे कार्यकारणी सदस्य संजय भगत, तसेच रामशेठ ठाकूर कॉमर्स अँड सायन्स कॉलेज खारघर कॉलेजच्या प्राचार्य महेश्वरी झिरपे तसेच पनवेल पंचायत समितीचे गटशिक्षण अधिकारी नवनाथ साबळे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

या कार्यक्रमास मराठी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक कैलास सत्रे, प्राचार्य प्रशांत मोरे, इंग्रजी माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक संतोष चव्हाण, मराठी प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक सुभाष मानकर, नीलिमा शिंदे मुख्याध्यापिका इंग्रजी प्राथमिक विभाग, पर्यवेक्षक अजित सोनवणे, पर्यवेक्षिका स्वाती पाटील, मराठी माध्यमिक विभागाचे पर्यवेक्षक कैलास म्हात्रे तसेच शिक्षक, विद्यार्थी व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते .

शुभम शेडेकर, धनश्री चव्हाण, श्रुती वाघीलकर, तन्वी जाधव, रिया मोर्या, सुरेश पटेल या विद्यार्थ्यांनी कार्यक्रमाचे निवेदन केले. मागील वर्षी इयत्ता अकरावीमध्ये प्रथम क्रमांक मिळवलेल्या विद्यार्थ्यांकडून श्रेया पाटील, साईल पाटील, श्रेया कोलपकर, धनराज कांबळे, सेजल तिवारी, तीर्थ खटके या अकरावीच्या विद्यार्थ्यांचे पुष्पगुच्छ देऊन प्रतिनिधिक स्वागत करण्यात आले. तसेच अकरावीच्या विद्यार्थ्यांना अध्यापनातील सर्व विषयांची माहिती देत विभागातील शिक्षकांचीही ओळख करून दिली.

करिअरच्या दृष्टिकोनातून आपण योग्य शाखा निवडली पाहिजे आजच्या युगात कॉमर्स शाखेला असलेले महत्त्व प्रमुख पाहुणे संजय भगत यांनी भाषणात विशद केले तर प्राचार्य प्रशांत मोरे यांनी विद्यालयाच्या प्रगत अशा पायाभूत सुविधांचा, संस्थेची मॅनेजमेंट कमिटी, अध्यापनाच्या विविध विषयांचा, तसेच राष्ट्रीय सेवा योजनेचा उल्लेख केला. डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर करा असे गटशिक्षण अधिकारी नवनाथ साबळे आपल्या भाषणातून म्हणाले.

विद्यार्थ्यांतर्फे हंसिका कलाल, श्रुती वाघीळकर तर शिक्षकांतर्फे दीप्ती वालम, दिलीप पाटील यांनी मनोगते व्यक्त केली.

# रिपाइं पनवेल शहर अध्यक्षपदी निलेश सोनावणे

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री तथा रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल महानगरपालिका क्षेत्र जिल्हा अध्यक्ष प्रभाकर कांबळे यांच्या मान्यतेने सामाजिक कार्यकर्ते तथा पत्रकार निलेश रामचंद्र सोनावणे यांची रिपाइं पनवेल शहर अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. रिपाइं महाराष्ट्र राज्य कार्यकारणी सदस्य सुमित मोरे व कांबळे यांच्या हस्ते सोनावणे यांना नियुक्तीपत्र दिले.

या नियुक्तीच्या वेळी रिपाइं खांदेश्वर शहर अध्यक्ष दिनेश जाधव, युवा अध्यक्ष अक्षय अहिरे, नवीन पनवेल अध्यक्ष अंकुश साळवे, रिपाइं कार्यकर्ते अमोल इंगोले उपस्थित होते.

या निवडीबद्दल रिपाइं रायगड जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड, प्रवक्ते तथा पनवेल महापालिका जिल्हा क्षेत्र कार्याध्यक्ष मोहन गायकवाड, तालुका अध्यक्ष विजय पवार यांच्यासह सामाजिक, शैक्षणिक, कला क्रीडा, शासकीय, राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी निलेश सोनावणे यांचे अभिनंदन केले.



# प्यारे जिया खान यांना पुरस्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

'महाराष्ट्र मित्र न्यूज' तर्फे 'महाराष्ट्र मित्र पुरस्कार' महाराष्ट्र राज्य अल्पसंख्याक आयोगाचे (मंत्रिमंडळ दर्जा) अध्यक्ष प्यारे जिया खान साहेब यांना प्रदान करण्यात आला. या वेळी 'महाराष्ट्र मित्र न्यूज'चे संपादक हनीफ कच्छी, हाजी जमीला, फकीर मोहम्मद शेख, युनुस शेख आणि अनेक सामाजिक कार्यकर्ते उपस्थित होते.

संपादक हनीफ कच्छी यांनी सांगितले की, प्यारे खान साहेब नेहमीच समाज आणि देशाच्या सेवेत तत्पर असतात. मुस्लिम समाजाची आवाज बनून जिथे कुठे कोणी अडचणीत असतो, तिथे जाऊन मदतीचा हात देण्याचा ते नेहमीच प्रयत्न करतात. म्हणूनच त्यांना हा पुरस्कार देण्यात आला आहे.

सर्वत्रून प्यारे खान साहेब यांना अभिनंदनाचे संदेश मिळत आहेत. मी समाज आणि देशासाठी अधिकाधिक चांगली सेवा देण्याचा प्रयत्न करेन, असे अध्यक्ष प्यारे खान यांनी या वेळी सांगितले.



# सिद्धांत सेवा संस्थेमार्फत वृक्षारोपण

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

शासनाच्या झाडे लावा – झाडे जगवा या अभियानांतर्गत सिद्धांत सेवा संस्थेच्या वतीने बिरोबा मंदिर, बेलापूर येथील परिसरात वृक्षारोपण सोहळा झाला. या कार्यक्रमासाठी महाराष्ट्र शासनाचा डॉ. बाबासाहेब समाज भूषण प्राप्त माजी विक्रीकर उपायुक्त रमेश चक्रे, न. मुं. मनपाचे माजी नगरसेवक अशोक गुरखे, रा.प. अधिकारी श्री अरुण निकम (माजी यंत्र अभियंता), समाजसेवक संजय पाथरे, रा प अधिकारी प्रसाद साटम, अहिल्यादेवी होळकर प्रतिष्ठानचे अध्यक्ष महादेव अर्जुन, सेवानिवृत्त पोलीस अधिकारी पांडुरंग गावडे, उद्योगपती देवाप्पा लवटे आदी उपस्थित होते.





गेल्या सात वर्षांमध्ये सातत्याने विविध भागांमध्ये वृक्षारोपण व वृक्ष संवर्धन हा उपक्रम राबवताना आत्तापर्यंत साधारण ९०० झाडांची रोपं लावली असून त्यातील ७० ते ८० टक्के झाडे जिवंत ठेवण्यात त्यांना यश मिळाले आहे, अशी माहिती संस्थेचे सचिव मिलिंद जाधव यांनी दिली. या वेळी रमेश चक्रे यांना महाराष्ट्र शासनाने सामाजिक क्षेत्रातील उत्कृष्ट कामगिरीबद्दल डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार देऊन गौरविल्याबद्दल सिद्धांत सेवा संस्थेच्या वतीने त्यांना विशेष सन्मानित करण्यात आले.

सूत्रसंचालन व प्रस्तावना संस्थेचे उपाध्यक्ष शशिकांत गोरड यांनी केले तर स्वागत व आभार संस्थेचे अध्यक्ष विजय कोळी यांनी मानले. या वेळी राजमाता अहिल्यादेवी होळकर प्रतिष्ठान, सानपाडा व बिरोबा देवस्थान समिती, बेलापूर यांचे विशेष सहकार्य मिळाले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गजानन गायकवाड, विनायक यादव, महावीर उरुणकर, अरुण दुश्मिकर, किरण साळवी, दिनेश कदम, विशाल वाघमारे यांनी परिश्रम घेतले.

# चांभार्लीत तरुणाची आत्महत्या

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

चांभार्ली गावामध्ये गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना रसायनी पोलीस ठाण्याच्या हद्दीत घडली असून पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार दिपक कुमार इश्वरदीप यादव (वय २०, रा. सुधीर मुंढे यांची चाळ, रूम नं. २, चांभार्ली) याने राहत्या रूममधील छताच्या लोखंडी पाईपला गळफास घेत आत्महत्या केली. काही दिवसांपासून मयत दिपक यादव हा विनाकारण बडबड करीत असल्याचे शेजारील साक्षीदार यांनी सांगितले आहे. याबाबत त्यांच्या रिंकी दिपककुमार यादव यांनी रसायनी पोलीस ठाण्यात खबर दिली असून रसायनी पोलीस ठाण्यात आकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली असून पुढील तपास सुरू आहे.





## निसर्ग श्रावणातला

घंगाळल्या पाऊसधारा.. वारा नाचतोय अंगणी
चला साऱ्या गं सयांनो.. गाऊ झिम्म्याची गाणी

श्रावणमासी जलधारां.. बरसल्यात पानोपानी
ऐकू पाखरांची गाणी.. चला जाऊयात रानी

मेजवानीच रानमेव्याची.. फुले बिट्टीचीही फुलली
चोखू फुलातला मधूरस.. खेळण्या पाखरे भुलली

रानमेवा करूया गोळा.. चला जाऊ रानच्यावाटे
निळ्याशार नभामधूनी.. काळेकुट्ट ते मेघही दाटे

रान फुललेय या फुलांनी.. पसरतो दरवळ साऱ्याचा
सुगंध घेऊनी संगतीलाच.. झोत घुमलाय वाऱ्याचा

थेंब बरसला ढगांखाली.. भिजली ही काळी आई
काळ्याकुट्ट मेघसरींना.. उतरण्याची झाली घाई

घालू झिम्माड झिम्मा.. आल्यात सया अंगणी
माझ्या प्रीतीच्या बाई.. गुंफून पंचमीची गाणी

हळदूल्या चाफ्याचा.. सुटलाया धुंद दरवळ
होऊन बेभान हा वात.. उगा करितो सळसळ

गेली भिजुन तृणपाती.. थेंब दवबिंदुंचे पिऊनी
डोलताती वाऱ्यासंगे.. झोकात वाकुनी लवूनी

शहारून गेली पाखरे.. पंखावर झेलती धारा
चिडीचुप्प घरट्यातुन.. पिऊनी उधाण वारा

थेंब निळ्या नभांतूनी.. आले ओथंबून धरेवर
जाग गोठ्याला आली.. भिजले सारेच चराचर

पिसाटलाय रानवारा.. झुलवतो वेलीची फुले
शिवारातला जोंधळा.. वाऱ्यासंगे मस्त डुले



–भारती सावंत, खारघर

# विंधणे येथे महाराजस्व समाधान शिबिर उत्साहात



**उरण : वार्ताहर**

महाराष्ट्राचे राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या संकल्पनेतून महसूल विभागामार्फत १ ऑगस्ट ते ७ ऑगस्ट या दरम्यान महाराष्ट्र राज्यात सप्तसूत्री कार्यक्रम राबविला जात आहे. त्या मधला तहसील कार्यालय उरण यांच्यामार्फत विंधणे ता. उरण येथील हनुमान मंदिरामध्ये श्री छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिराचे अभियान आयोजन करण्यात करण्यात आले होते.

या शिबिरात विविध प्रकारचे दाखले वितरण, शेतकरी यांच्या साठी विविध योजना चा लाभ घेण्या साठी एकाच जागी सर्व तहसील कार्यालयातील अधिकारी कर्मचारी उपलब्ध होते. शासनाच्या या नाविन्यपूर्ण उपक्रमाचा लाभ विंधणे ग्रामस्थ व परिसरातील इतर गावातील ग्रामस्थ यांनी घेतला.

प्रशासनाच्या या जनतेच्या दारी प्रत्यक्षात दारी जासून सेवा देण्याच्या उपक्रमाचे जनतेमध्ये उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. या वेळी तहसील उरण कार्यालयातील नायब तहसीलदार रवींद्र सानप, मंडळ अधिकारी जासई मनिष जोशी, मंडळातील तलाठी अमोल घरत (जासई)सत्यवान पाटील (वेश्वी), निहाल सिंग जास्वाल (विंधणे), राजाराम जोशी, रामकृष्ण नवाळे, मधुकर नवाळे, आदींसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# उरण महाविद्यालयात माईंड मॅपिंग विषयावर कार्यशाळा

**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी आयडिया जनरेशन, कल्पना निर्मिती तसेच माइंड मॅपिंग या विषयावर कार्यशाळेचे आयोजन केले गेले तसेच सायबर पिळवणूक या विषयावरदेखील या कार्यशाळेत विचार मंथन झाले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाल्मीक गरजे कार्यक्रमाचे अध्यक्ष होते त्यांनी सायबर पिळवणूक समजून घेणे आवश्यक असून आपण सोशल मीडिया व ऑनलाइन व्यवहाराच्या माध्यमातून सायबर पिळवणुकीत अडकले नाही पाहिजे असे सांगितले.



कार्यक्रमात प्रमुख पाहुणे डॉ. केतन वीरा (डायरेक्टर तथा प्राचार्य पिल्लई मॅनेजमेंट महाविद्यालय, रसायनी, पनवेल हे उपस्थित होते. त्यांनी माईंड मॅपिंगविषयी विद्यार्थ्यांना सविस्तर मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांच्या मनातील आयडिया व कल्पना लेखी स्वरुपात कागदावर उमटवण्याची कार्यशाळा घेतली. आपल्या मनातील विविध संकल्पना या माध्यमातून विद्यार्थ्यांनी माईंड मॅपिंगद्वारे कथन केल्या. व नवनिर्मितीच्या अनुषंगाने चिंतन केले. महाविद्यालयातील ज्येष्ठ प्रा. व्हि.एस. इंदुलकर यांनी यावेळी आपल्या भावना व्यक्त करताना असे वर्कशॉप काळाची गरज असल्याचे सांगितले.

या वेळी पूर्वा पाटील (आऊटरीच ऑफिसर, पिल्लई ग्रुप, रसायनी) या उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना प्रमुख डॉ. दत्ता हिंगमिरे यांनी केले, तर उपस्थितांचे आभार आयक्युएसी समन्वयक डॉ. ए. आर. चव्हाण यांनी व्यक्त केले. कार्यशाळेत महाविद्यालयातील सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# तरुणाच्या गळ्यातून चेन खेचली

**पनवेल : वार्ताहर**

दुचाकीवरून घरी परतणाऱ्या तरूणाच्या गळ्यातून सोनसाखळी हिसकावून चोरटे फरार झाले आहेत. ही घटना खारघर येथील तवा हॉटेलसमोरील सिग्नलशेजारी घडली. याबाबत खारघर पोलीस ठाण्यात अनोळखी चोरट्यांविरोधात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

खारघर येथील सेक्टर २० येथील श्री टॉवरमध्ये राहणारे ३९ वर्षीय तरूण हे काम संपवून घरी परतत असताना ही घटना घडली. दुचाकीवरून घरी येणाऱ्या या तरुणाने सिग्नलशेजारील गतिरोधक असल्याने दुचाकीचा वेग कमी केला. या दरम्यान अचानक दुचाकीशेजारी दुसऱ्या दुचाकीवरून एक दुकली तेथे आली. धावत्या दुचाकीवरूनच मागे बसलेल्या चोरट्याने या तरुणाच्या गळ्यातील सोनसाखळी हिसकावून तेथून धूम ठोकली. तरुणाने चोरट्यांचा पाठलाग केला, मात्र अंधारात काही क्षणात चोरटे तेथून पसार झाले.

# भाजपच्या पुढाकाराने माथेरानच्या समस्या सुटणार

## मंत्री आशिष शेलार यांच्यासोबतच्या बैठकीनंतर आशादायी वातावरण

**माथेरान : प्रतिनिधी**

जगप्रसिद्ध पर्यटनस्थळ माथेरानमध्ये प्रलंबित असलल्या विकासकामासंदर्भात महाराष्ट्राचे माहिती तंत्रज्ञानमंत्री व भाजपचे रायगड जिल्हा संपर्कमंत्री आशिष शेलार यांच्या अध्यक्षतेखाली पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर व उरणचे आमदार महेश बालदी यांच्या उपस्थितीमध्ये संबंधित सर्व खात्यांच्या अधिकाऱ्यांसोबत मुंबईत एक विशेष बैठक आयोजित करण्यात आली होती. यामध्ये माथेरानच्या विविध समस्या मंत्री आशिष शेलार यांनी जाणून घेतल्या व संबंधित खात्यांना त्या सोडवण्याकरिता आदेशित केले. त्यामुळे आशेचा किरण निर्माण झाला आहे.



माथेरानमध्ये अस्तित्वात असलेल्या सनियंत्रण समिती पुनर्गठीत करण्याबाबत निर्णय घेण्यात यावा यावर चर्चा झाली. या समितीची मुदत संपल्यामुळे नवीन समिती लवकरात लवकर स्थापन करून माथेरानच्या समस्या ज्यांना जवळून अवगत आहेत अशा लोकांना यामध्ये समाविष्ट करून स्थानिक नागरिकांना प्राधान्य द्यावे, असेही सूचित करण्यात आले.

माथेरानकरांचा अनेक वर्षांपासून पर्यायी रस्त्याच्या मागणीचा विचार या वेळी करण्यात आला. प्रस्तावित रोपवे व पनवेल-माथेरान मार्ग तसेच फ्युनिक्युलर रेल्वे हे प्रकल्प का रखडले गेले याची पूर्ण माहिती घेतल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांना हे मार्ग लवकरात लवकर मार्गी लागावे याकरता सूचना करण्यात आल्या. त्याचप्रमाणे पनवेल हे आता तिसऱ्या मुंबईचे महत्त्वाचे केंद्र ठरत असल्याने हा मार्ग उपलब्ध झाल्यास येथे येणाऱ्या पर्यटकांमध्ये मोठी भर पडणार असल्याने फ्युनिक्युलर रेल्वे येथील आकर्षण ठरणार असल्याने व त्याची सर्व परवानगीही झाली असल्याने त्यास प्राधान्य देऊन हा प्रकल्प एमएमआरडीए ध्ये येत असून संबंधित अधिकाऱ्यांना अहवाल सादर करावा असे सांगण्यात आले.

मागील काही वर्षांमध्ये येथील वाहनतळाच्या अपुऱ्या जागेमुळे घाटामध्ये होणाऱ्या वाहतूक कोंडीचा प्रश्न कायमस्वरूपी मिटावा याकरिता येथील शासनाचा भूखंड क्रमांक ९३ हा विनामोबदला पालिकेकडे हस्तांतरित करून येथे वाहनस्थळ तातडीने सुरू करावे असे रायगड जिल्हाधिकाऱ्यांना या वेळी सांगण्यात आले. माथेरानमध्ये हातरिक्षा तात्काळ बंद करून येथे पर्यावरणपूरक ९४ ई-रिक्षांना परवानगी मिळण्याकरिता राज्य शासनाकडून सर्वतोपरी मदत करण्यात येईल असे सांगण्यात आले.

माथेरानमधील अंतर्गत रस्ते तातडीने दुरुस्त करण्याकरिता संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या. यावेळी बोलताना माथेरानचे अनेक वर्षांपासून असलेले प्रलंबित प्रश्न तातडीने सोडविण्याकरिता भाजपा पक्ष नेहमी अग्रेसर असून लवकरात लवकर माथेरानकरांची या समस्यातून सुटका करणार असल्याचे मंत्री आशिष शेलार यांनी सांगितले. यामध्ये पर्यावरण, महसूल, जिल्हाधिकारी; त्याचप्रमाणे एमएमआरडीएचे अधिकारी, माथेरान पालिका मुख्याधिकारी, अधीक्षकदेखील उपस्थित होते.

ही बैठक आयोजित व्हावी याकरिता माथेरानचे माजी उपनगराध्यक्ष आकाश चौधरी, भाजप शहराध्यक्ष प्रवीण सकपाळ, उपाध्यक्ष किरण चौधरी यांनी सातत्याने प्रयत्न केले. बैठकीस माजी नगरसेवक राजेश चौधरी, प्रदीप घावरे, संदीप कदम, हातरिक्षा चालक-मालक संघटनेचे अध्यक्ष शकील पटेल, सचिव सुनील शिंदे, रूपेश गायकवाड, चैतन्य शिंदे हेही उपस्थित होते.

# जिल्ह्यात ११ ऑगस्ट रोजी महसूल अदालत

**रायगड : रामप्रहर वृत्त**

जिल्ह्यातील सर्व तहसीलदार, उपविभागीय अधिकारी व अपर जिल्हाधिकारी यांच्याकडे विविध कारणांमुळे प्रलंबित व सुरू असलेले दावे निकाली काढण्यासाठी महसूल लोक अदालतीचा कालबद्ध कार्यक्रम निश्चित करण्यात आला आहे.

११, १८ आणि २५ ऑगस्ट रोजी अपर जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार स्तरावर स. ११व्या महसूल लोक अदालतचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती अपर जिल्हाधिकारी सुनील थोरवे यांनी दिली. सर्व पक्षकार व विधिज्ञ यांनी या लोक अदालतीचा लाभ घेऊन प्रकरणे तत्परतेने निकाली काढावीत, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले आहे.

या महसूल लोक अदालतमध्ये जास्तीत जास्त प्रकरणे निकाली काढण्यासाठी कार्यपद्धती निश्चित करण्यात आली असून एकच सुनावणी बोर्ड असलेल्या तहसीलदार व उपविभागीय अधिकारी यांनी तीन सुनावणी घेऊन प्रकरण निर्णयार्थ ठेवायचे आहे. सर्व तहसीलदार स्तरावरील तसेच उपविभागीय अधिकारी अलिबाग, पेण, रोहा, श्रीवर्धन यांच्या स्तरावरील महसूल अदालत ११, १८ आणि २५ ऑगस्ट रोजी होणार आहेत. पनवेल, कर्जत, माणगाव, महाड उपविभागीय स्तरावरील महसूल अदालत तीन टप्प्यात होणार आहे. पाहिला टप्पा ११, १८, २५ ऑगस्ट, दुसरा टप्पा १४, २१, २८ ऑगस्ट तर तिसरा टप्पा २२, २९ ऑगस्ट आणि १२ सप्टेंबर रोजी प्रस्तावित आहेत.

अपर जिल्हाधिकारी स्तरावरील महसूल अदालत अलिबाग, मुरूड आणि पेण तालुक्यासाठी अपर जिल्हाधिकारी कार्यालय अलिबाग येथे ११, १८ आणि २५ रोजी होणार आहे, तर १२, १९ आणि २६ ऑगस्ट रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालय माणगाव येथे माणगाव, तळा, महाड, पोलादपूर, श्रीवर्धन, म्हसळा, रोहा, सुधागड तालुक्यासाठी महसूल अदालत आयोजित केली आहे. पनवेल, उरण कर्जत, खालापूर तालुक्यासाठी अपर तहसीलदार कार्यालय पनवेल येथे २२, २९ ऑगस्ट आणि १२ सप्टेंबर रोजी ही अदालत होणार आहे.

या महसूल अदालतीसाठी अपीलात नोटीस रुजू न झालेल्या अपिलार्थी व उत्तरार्थी यांना आगाऊ नोटीस देण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. तसेच महसूल लोक अदालत मध्ये प्रलंबित प्रकरणांचा निपटारा करण्याकरिता अपीलांची सुनावणी ही एकाच दिवशी सकाळी (११ वा) व दुपारी (३ वा) अशा दोन सत्रामध्ये घेण्यात येणार आहे. अपिलार्थी यांनी उत्तरार्थी यांना नोटीसची बजावणी करणे, अपील किंवा दावे यामध्ये पक्षकार मयत असल्यास मयत व्यक्तींचे वारस रेकॉर्डवर घेणे व वारसांना नोटीसची बजावणी करणे, अपिलार्थी यांनी उत्तराची यांना नोटीस बजावणी झाली नसल्यास उत्तरार्थी यांना हजर होणेकामी वर्तमान पत्रात जाहीर नोटीस प्रसिद्धीस देण्यात येईल.

# प्रसन्नकुमार कामतांच्या पुण्यस्मरणानिमित्त विमा आणि मेडिक्लेमचा धनादेश सुपूर्द

**अलिबाग : प्रतिनिधी**

सहयोग व्यापारी नागरी सहकारी पतसंस्थेचे माजी अध्यक्ष, माजी उपाध्यक्ष तसेच माजी सचिव म्हणून उल्लेखनीय कार्य करणारे प्रसन्नकुमार वासुदेव कामत यांचे दुर्दैवी अपघाती निधन झाले होते. त्यांच्या तिथीनुसार प्रथम पुण्यस्मरण दिनानिमित्ताने पतसंस्थेच्या संचालक अपघाती विमा योजनेंतर्गत पाच लाख रुपये तसेच महाराष्ट्र राज्य वेल्फेअर असोसिएशनच्या सहकारी संस्थांसाठीच्या मेडिक्लेम योजनेंतर्गत ४८ हजार रुपये असे धनादेश पतसंस्थेच्या वतीने देण्यात आले.



प्रसन्नकुमार कामत यांच्या पत्नी सुरेखा कामत, भाऊ संजय कामत, मुले विराज व प्रवीण यांना धनादेश सुपूर्द करण्यात आले. या वेळी पतसंस्थेचे अध्यक्ष योगेश मगर, संचालक हरेश गायकर, सुनील तांबडकर, निळकंठ केमकर, व्यवस्थापक वैभव बोर्लीकर, गणेश मौर्य उपस्थित होते.

संस्थेचे अध्यक्ष श्री. मगर यांनी स्व. प्रसन्नकुमार कामत यांच्या कार्याची आठवण करून देत सांगितले की, कामत सरांनी संस्थेसाठी दिलेले योगदान अमूल्य आहे. सदस्यांच्या हितासाठी त्यांनी आयुष्यभर काम केले. त्यांच्या स्मृती आमच्या हृदयात सदैव जिवंत राहतील. कार्यक्रमात त्यांच्या स्मृतींना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

# खालापूरच्या समस्यांबाबत निवेदन

**खोपोली : प्रतिनिधी**

नगरपंचायत हद्दीतील समस्या खालापूर नागरिकांची पाठ सोडण्यास तयार नसून नव्याने नगरपंचायत मुख्याधिकारीपदाचा पदभार स्वीकारलेल्या कोमल कराळे यांनी खालापुरात राहण्याचा अनुभव घेत समस्या मार्गी लावा, असे निवेदन देण्यात आले आहे.

खालापूर नगरपंचायतीच्या पेयजल योजनेचे काम रखडले आहे. यामुळे महिलांच्या डोक्यावरील हंडा अद्याप उतरलेला नाही. पाताळगंगा नदीचे दूषित आणि चिखलयुक्त पाणी नागरिकांना वापरावे लागत आहे. कोटींचा निधी खर्च केल्याचे दाखवत असताना मूलभूत सुविधांची वानवा आहे. सर्व समस्याची जंत्री घेऊन खालापुरातील सामाजिक कार्यकर्त्या क्षमा आठवले, योगेश जाधव, गणेश पारंगे, दीपक जगताप, सचिन पारठे, गणेश साळुंखे, श्री पाष्टे सह नागरिकांनी या समस्यातून मार्ग काढण्यासाठी मुख्याधिकारी कोमल कराळे यांनी खालापूरात वास्तव्य करावे, असे लेखी निवेदन दिले.

मुख्याधिकारी यांच्या अनुपस्थित कार्यालयीन अधिकारी जितेंद्र यादव यांच्याकडे निवेदन दिले. यादव यांनी मुख्याधिकारी कर्जत येथे बैठकीसाठी असल्याचे सांगून लवकरात नागरिकांसोबत बैठक लावण्याचे आश्वासन दिले आहे.

# महाडमध्ये अल्पवयीन मुलीचा विनयभंग; आरोपी अटकेत

**महाड : प्रतिनिधी**

महाड एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका ७५ वर्षीय वृद्धाने १२ वर्षीय मुलीचा विनयभंग केल्याची घटना घडली. पोलिसांनी आरोपी जगन्नाथ सुखदेव सूर्यवंशी (वय ७५) याला ताब्यात घेतले.

पीडित मुलगी शिक्षिकेच्या घरी शिकवणीसाठी जात होती. आरोपी, जो शिक्षिकेचाच वडील आहे, त्याने तिला चॉकलेट व फुलांचे आमिष दाखवून तिचा विनयभंग केला. पीडितेने विरोध करून शिक्षिकेला सांगेन बोलल्यावर आरोपीने तिला सोडून दिले. अधिक तपास सुरू आहे.

# कोलाड ज्येष्ठ नागरिक मंडळाचा वर्धापन दिन

**रोहा : प्रतिनिधी**

आंबेवाडी नाका येथील राजश्री वसंत महाबळे यांच्या निवासस्थानी कोलाड स्नेह ज्येष्ठ नागरिक कल्याणकारी मंडळाचा १५वा वर्धापन दिन आणि वार्षिक सर्वसाधारण सभा आयोजित करण्यात आली होती.

या वेळी ज्येष्ठ नागरिक मंडळाचे नवनिर्वाचित अध्यक्ष दगडू बामुगडे, माजी अध्यक्ष मारुती राऊत, प्रदीप कुर्ले, प्रतिभा पार्टे, राष्ट्रवादी रोहा तालुका अध्यक्ष प्रितम पाटील, माजी सभापती सुनिता महाबळे, राजश्री महाबळे, रायगड जिल्हा माजी सरचिटणीस धनवी, खांब ज्येष्ठ नागरिक संघटनेचे अध्यक्ष तुकाराम कापसे, निवृत्त पीएसआय सावंत यांच्यासह ज्येष्ठ नागरिक मंडळाचे संचालक उपस्थित होते.

कोलाड ज्येष्ठ नागरिक मंडळाचे कार्याध्यक्ष प्रवीण गांधी यांनी प्रास्ताविकातून मंडळाची ध्येयधोरण व आतापर्यंत करत असलेल्या कार्यपद्धतीची माहिती दिली.



या वेळी वय वर्षे ७५ पूर्ण झालेल्या सभासदांना आधार काठी व सन्मानपत्र, ज्या सभासदांच्या विवाहाची ५० वर्षे पूर्ण होऊन वयाचीही ७५ वर्षे पूर्ण झाली आहेत अशा भाग्यवंत जोडप्यांना पुष्पगुच्छ, शाल श्रीफळ, ब्लाऊज पीस व नंदकुमार पवार यांच्या वतीने देण्यात येणारी आधार काठी देऊन सर्वांना सन्मानित करण्यात आले. ऑगस्ट महिन्यांत वाढदिवस असलेल्या सर्वच सभासदांना ज्येष्ठ नागरिक मंडळाच्या वतीने शुभेच्छा कार्ड देऊन सन्मानित करण्यात आले.

मान्यवरांनी मनोगत व्यक्त करताना कोलाड ज्येष्ठ नागरिक मंडळाची फारच सुंदर कार्यपध्दती चालू आहे व याही पुढे असेच उत्तम कार्य चालू रहावो, असे कौतुकास्पद वर्णन करून या ज्येष्ठ नागरिक मंडळास भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

ज्येष्ठ नागरिक मंडळाचे उपाध्यक्ष मारुती मालुसरे यांनी मागील वर्षीचा अहवाल, जमाखर्च व नवीन कार्यकारणी नियुक्तीचे वाचन करून सर्वांमुते मंजुरी घेण्यात आली. महत्त्वाचे म्हणजे कै. कुर्लेयांच्या स्मरणार्थ त्यांच्या कुटुंबियांनी ज्येष्ठ नागरिक मंडळास एक साऊंड सिस्टीम भेट देऊन सहकार्य केले.

ज्येष्ठ नागरिक मंडळाचे नवनिर्वाचित अध्यक्ष दगडू बामुगडे यांनी मार्गदर्शन करीत उपस्थित मान्यवर, संचालक मंडळ, ज्येष्ठ श्रेष्ठ सहकारी सभासद व उपस्थित माता-भगिनी यांचे स्वागत करून त्यांचे आभार व्यक्त केले. ज्येष्ठ नागरिक मंडळास सभागृह मिळवून देणारे खासदार सुनील तटकरे मंत्री आदिती तटकरे, माजी आमदार अनिकेत तटकरे यांचेही आभार मानले.

कार्यक्रमाच्या सुरवातीला ज्येष्ठ नागरिक मंडळाचे सहसचिव सहदेव कापसे यांनी सर्वांचे स्वागत करून मान्यवरांच्या हस्ते श्री गणेश पूजन करण्यात आले. प्रणिता गांधी यांनी पसायदान व इशस्तवन सादर करून कार्यक्रमाची सुरुवात केली. सूत्रसंचालन कापसे यांनी केले, तर आभार अशोक कदम यांनी मानले. या सभेस १७० सभासद उपस्थित होते.

# पोलीस निरीक्षक कार्यालयात सीए पदासाठी अर्ज करा

**रायगड : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्हा पोलीस कल्याण निधी अंतर्गत घटक पोलीस कल्याण निधी रायगड व त्या अंतर्गत चालणारे उपक्रम (पोलीस कँटीन- वेल्फेअर पेट्रोलपंप) यांची वार्षिक तपसणी करण्याच्या अनुषंगाने चार्टर्ड अकाऊंटंट (लेखा परीक्षक) यांची नेमणूक करावयाचे प्रयोजन आहे.

यासाठी पोलीस अधीक्षक रायगड अलिबाग कार्यालयातून इच्छुक खाजगी सीए यांचे अर्ज मागविण्यात आलेले आहेत. तरी इच्छुक खासगी सीए यांनी पोलीस निरीक्षक, पोलीस कल्याण शाखा, पोलीस अधीक्षक कार्यालय रायगड, अलिबाग यांच्याकडे अर्ज सादर करण्यात यावे, असे आवाहन तानाजी नारनवर, पोलीस निरीक्षक, अतिरिक्त कार्यकारी पोलीस उपअधीक्षक गृह, पोलीस अधीक्षक कार्यालय, रायगड अलिबाग यांनी केले आहे.

# उमरोली शाळेतील विद्यार्थ्यांना चॅरिझेन फाउंडेशनतर्फे दप्तर वाटप

**माणगाव : प्रतिनिधी**

सामाजिक, शैक्षाणिक क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या चॅरिझेन फाउंडेशनतर्फे माणगाव तालुक्यातील उमरोली येथील रायगड जिल्हा परिषद शाळेच्या व अंगणवाडी शाळेतील विद्यार्थ्यांना शुक्रवारी (दि. ८) दप्तर वाटप करून विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित करण्यात आला.

चॅरिझेन फाउंडेशन हे रायगड जिल्ह्यात विशेषत: बहुजन समाजात बांधिलकी ठेवून आपण समाजाचे काहीतरी देणेकरी लागतो हा उदात्त हेतू नजरेसमोर ठेवून सातत्याने सामाजिक व शैक्षणिक उपक्रम राबवित आहेत. माणगाव तालुक्यात या फाउंडेशनमार्फत महिलांसाठी शिलाई कोर्स, विद्यार्थ्यांना मोफत शैक्षणिक साहित्याचे वाटप, रक्तदान शिबिर असे विविध उपक्रम राबविले जात आहेत.



आजचे विद्यार्थी हे उद्याच्या भारताचे भावी नागरिक आहेत हे ओळखून या विद्यार्थ्यांना शिक्षणात प्रोत्साहन देण्याचे काम फाउंडेशन निस्वार्थीपणे करीत आहे. यालाच अनुसरून तालुक्यातील उमरोली येथील राजिप शाळेच्या विद्यार्थ्यांना दप्तर (स्कूल बॅग) देऊन या विद्यार्थ्यांचा आनंद द्विगुणित करण्यात आला तसेच उमरोलीतील अंगणवाडी शाळेतील विद्यार्थ्यांना दप्तर वाटप करून या शाळेत विजेची व पंख्याची सोय केली गेली.

चॅरिझेन फाउंडेशनच्या या उपक्रमाबद्दल त्यांचे उमरोली शाळेतील व अंगणवाडीतील शिक्षकवर्ग तसेच ग्रामस्थांनी कौतुक करीत आभार मानले.

या कार्यक्रमास फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष कॅ. निर्मलसिंग रंधवा, संचालिका पूजा रंधावा, मार्केटिंग हेड राकेश पडवळ, ऑडिटर किशोर झेमसे, व्यवस्थापक विलास आठवले यांच्यासह शिक्षकवर्ग, सेविका, शिक्षकेतर कर्मचारी, पालक, ग्रामस्थ आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# खालापुरात 11 ते 13 ऑगस्टला ॲग्रीस्टॅक कार्यक्रम

**चौक : प्रतिनिधी**

कृषी क्षेत्रात डिजिटल सेवांचा वापर करून शासनाच्या योजनांची अंमलबजावणी व माहिती होण्यासाठी खालापूर तालुक्यातील प्रत्येक गावात ॲग्रीस्टॅग कार्यक्रमाचे शिबिर आयोजित करण्यात आले आहे. त्यालुक्यात ११ ते १३ ऑगस्टदरम्यान होणाऱ्या या कार्यक्रमाचा लाभ प्रत्येक शेतकरी यांनी घ्यावा, असे आवाहन तहसीलदार अभय चव्हाण यांनी केले आहे.

वाढत्या लोकसंख्येचा विचार करता अन्नधान्य उपलब्धता, शेती आणि शेती संलग्न व्यवसाय इ. जोपासणे, कृषी मालास साठवणूक सुविधा, योग्य बाजारपेठ, भाव तसेच कृषी प्रक्रिया उद्योगांना चालना देणे गरजेचे आहे. महाराष्ट्रात कृषी क्षेत्राशी संबंधित लोकसंख्या ५५ टक्के आहे. कृषी क्षेत्राच्या विकासासाठी केंद्र आणि राज्य शासनाद्वारे अनेक महत्त्वपूर्ण योजना राबविण्यात येत आहेत. या योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी उपलब्ध संसाधनांचा उचित विनियोग करून योग्य व पात्र लाभार्थ्यांपर्यंत लाभ पोहचवून कृषी क्षेत्राचा अधिकाधिक विकास शक्य आहे.

राज्यातील कृषी क्षेत्रात डिजिटल सेवांचा वापर करुन शासनाच्या विविध योजनांचा जलद गतीने व परिणामकारकरित्या लाभ शेतकऱ्यांना देणे सुलभ व्हावे याकरीता केंद्र शासनाची ॲग्रिस्टॅक योजना राज्यात राबविण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

खालापूर तालुक्यात एकूण शेतकरी खातेदार संख्या २३८११ पैकी ७६८० (३२.२५%) एवढे ॲग्रीस्टॅकमध्ये शेतकरी खातेदारांची नोंदणीचे काम पूर्ण झालेले आहे. हे काम १०० टक्के करण्यासाठी प्रत्येक ग्रामपंचायतनिहाय ग्रामपंचायात अधिकारी, कृषी सहायक व ग्राम महसूल अधिकारी तसेच आपले सेवा केंद्र यांचे मार्फत ॲग्रीस्टॅकमध्ये खातेदारांची नोंदणीची कार्यवाही या कार्यक्रमाद्वारे करण्यात येईल.

# वनवासी कल्याण आश्रमशाळेत भरला तिबोटी खंड्याचा वर्ग

**माणगाव : बातमीदार**

माणगावमधील वनवासी कल्याण आश्रमशाळेत पिटुकला पण रंगीबेरंगी व सुंदर असा एक पक्षी आला. त्यामुळे शाळेच्या आवारात मुला-मुलींची हा पक्षी पाहण्यासाठी एकच गर्दी झाली. ही गोष्ट शाळेचे अधिक्षक विलास देगावकर यांच्या लक्षात आली, आदिवासी मुलांची शाळा असल्यामुळे पक्षी, प्राणी आणि निसर्ग हे या सर्व मुलांच्या अगदी जिव्हाळ्याचे विषय. मग देवानंद नावाच्या सातव्या इयत्तेत शिकत असलेल्या विद्यार्थ्याने शाळेच्या व्हरांड्यात पडलेला हा पक्षी सुरक्षितरित्या हातावर घेऊन देगावकर सरांच्याकडे आणला, त्यानंतर शाळेच्या आवारातच या पक्ष्याला त्वरित सोडण्यात आले, परंतु दुसऱ्याच दिवशी पुन्हा हा पक्षी शाळेत आला.



विद्यार्थ्यांसोबत शिक्षकांमध्येसुद्धा मोठ्या कुतूहलाचा विषय निर्माण झाला. देगावकर यांनी ही गोष्ट वन्यजीव अभ्यासक शंतनु कुवेसकर यांना सांगितली. कुवेसकर यांनी शाळेस भेट देत विद्यार्थ्यांनी सुरक्षितरित्या एका खोक्यामध्ये ठेवलेल्या पक्ष्याला बाहेर काढत पाहणी केली. हा पक्षी कोणत्याही जखमेविना, तंदुरुस्त, पण अपरिपक्क पिल्लू आहे, असे सांगत हे पिल्लू साधारणतः याच मोसमात १५-२० दिवसांपूर्वी घरट्यातून उडून बाहेर पडले असावे अन् हा आपल्या रायगडचा जिल्हा पक्षी तिबोटी खंड्या असून त्याच्याबद्दलची संपूर्ण माहिती विद्यार्थी आणि शिक्षकांना दिली.

शंतनु कुवेसकर यांच्यामार्फत विद्यार्थ्यांनीच पक्षी राहण्यायोग्य अशा असलेल्या शाळेजवळील नैसर्गिक अधिवासात जाऊन मोकळे सोडताच तिबोटी खंड्याचे हे पिल्लू भरारी घेत स्वैरपणे उडून गेले. त्यावेळी विद्यार्थ्यांचा आनंद गगनात मावत नव्हता. लहान विद्यार्थ्यांप्रमाणेच निसर्गातदेखील एक विद्यार्थीसमान असलेला हा वाढीस लागलेला पिटुकला पक्षी शाळेत येऊन काहीतरी शिकून आनंदाने आता आयुष्यातल्या त्याच्या पुढच्या प्रवासास उडून गेला असा समज घालत शिक्षकांनी सर्व मुला-मुलींना पुन्हा शाळेच्या वर्गात नेले.

या वेळी वनवासी कल्याण आश्रम प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक अरुण पाटील, माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक उत्तम पाटील, प्राथमिक शिक्षक काशिनाथ घाणेकर, शिक्षिका मयुरी भगत, अधिक्षक विलास देगावकर, प्रयोगशाळा परिचर दिनेश पारधीदेखील सर्व विद्यार्थ्यांसह उपस्थित होते.

सध्याच्या पावसाळी दिवसात जून ते सप्टेंबरपर्यंत तिबोटी खंड्या या पक्ष्यांचा विणीचा हंगाम असतो. दक्षिणेकडून हे पक्षी मुख्यतः स्थलांतर करून मोठ्या प्रमाणात कोकणात तसेच अगदी मुंबई ते गुजरातच्या सीमेपर्यंत उपलब्ध नैसर्गिक आवासांमध्ये येतात, तशा नोंदी आहेत.

# आशिया चषकातून पंत 'आऊट'

## दुखापतीमुळे विंडीज दौऱ्यावरही अनिश्चिततेचे सावट

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

भारतीय क्रिकेट संघाचा स्फोटक यष्टिरक्षक-फलंदाज ऋषभ पंत याला इंग्लंड दौर्‍यात झालेली दुखापत अपेक्षेपेक्षा गंभीर असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे तो आगामी आशिया चषक स्पर्धेला पूर्णपणे मुकणार आहे, तर ऑक्टोबर महिन्यात होणाऱ्या वेस्ट इंडिजविरुद्धच्या महत्त्वाच्या कसोटी मालिकेतील त्याच्या सहभागावरही मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पंतच्या अनुपस्थितीमुळे विशेषतः कसोटी संघात एक मोठी पोकळी निर्माण झाली असून संघाच्या नियोजनाला मोठा धक्का बसला आहे.

इंग्लंडविरुद्ध मँचेस्टर येथील ओल्ड ट्रॅफर्ड मैदानावर २३ ते २७ जुलैदरम्यान झालेल्या चौथ्या कसोटी सामन्याच्या पहिल्या दिवशी पंतला दुखापत झाली होती. भारतीय डावादरम्यान वेगवान गोलंदाज ख्रिस वोक्सच्या गोलंदाजीवर पंतने आपला नेहमीचा आक्रमक पवित्रा दाखवत रिव्हर्स स्वीपचा धाडसी फटका खेळण्याचा प्रयत्न केला, मात्र याच प्रयत्नात चेंडू थेट त्याच्या पायाच्या बोटावर आदळला आणि त्याला गंभीर दुखापत झाली.

सुरुवातीला ही दुखापत किरकोळ वाटत असली तरी नुकत्याच समोर आलेल्या वैद्यकीय अहवालानुसार पंतच्या पायाच्या बोटाला फ्रॅक्चर असल्याचे निदान झाले आहे. दिलासादायक बाब म्हणजे या दुखापतीसाठी शस्त्रक्रियेची गरज नाही, मात्र बीसीसीआयच्या वैद्यकीय पथकाने त्याला किमान सहा आठवड्यांची सक्तीची विश्रांती घेण्याचा सल्ला दिला आहे.



कसोटी संघात पंतची अनुपस्थिती हा संघासाठी एक जबरदस्त धक्का आहे. इंग्लंडविरुद्धच्या मालिकेतून बाहेर होण्यापूर्वी त्याने चार सामन्यांमध्ये दोन शतके आणि तीन अर्धशतकांसह ४७९ धावा कुटल्या होत्या. त्याची आक्रमक फलंदाजी आणि कोणत्याही क्षणी सामन्याचे चित्र पालटण्याची क्षमता भारतीय संघासाठी अमूल्य होती. त्यामुळे वेस्ट इंडिजविरुद्धच्या मालिकेत संघाला त्याची मोठी उणीव भासेल.

### ध्रुव जुरेलला संधी?

पंतच्या अनुपस्थितीमुळे इंग्लंडविरुद्धच्या पाचव्या कसोटीत युवा यष्टिरक्षक-फलंदाज ध्रुव जुरेल याला संधी देण्यात आली होती. आता जर पंत वेस्ट इंडिज मालिकेसाठी उपलब्ध नसेल, तर आग्र्याच्याच या उदयोन्मुख खेळाडूलाच यष्टिरक्षणाची धुरा सांभाळावी लागण्याची दाट शक्यता आहे.

# लहानग्या तनिष्का गर्गला 'फिडे' मानांकन

**चंदिगड : वृत्तसंस्था**

वय हे केवळ एक आकडा आहे, ही म्हण बठिंडा येथील अवघ्या आठ वर्षे, चार महिन्यांच्या तनिष्का गर्गने अक्षरशः खरी करून दाखवली आहे. आपल्या विलक्षण बुद्धिमत्तेच्या आणि अचूक चालींच्या जोरावर तिने आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ महासंघाचे (फिडे) मानांकन मिळवले असून ही कामगिरी करणारी ती पंजाबमधील महिला गटातील सर्वात युवा खेळाडू ठरली आहे.

गेल्या महिन्यात गुरूग्राम येथे झालेल्या नऊ वर्षांखालील राष्ट्रीय बुद्धिबळ स्पर्धेतील चमकदार कामगिरीमुळे तनिष्काने हे यश मिळवले. फिडेने ऑगस्ट महिन्यात अधिकृतपणे मानांकन जाहीर करताच तनिष्काच्या नावावर या ऐतिहासिक विक्रमाची नोंद झाली.

यापूर्वी हा विक्रम नऊ वर्षांहून अधिक वय असलेल्या तन्वीर कौर खिंदाच्या नावावर होता, मात्र तनिष्काने वयाच्या आठव्या वर्षीच हा टप्पा गाठून सर्वांना चकित केले आहे. तनिष्काचा बुद्धिबळाचा प्रवास तिच्या वयाच्या चौथ्या वर्षी सुरू झाला. तिची आई मीनू गर्ग, सांगतात, आमचा मोठा मुलगा बुद्धिबळ प्रशिक्षक पंकज शर्मा यांच्याकडे शिकायला जात असे. तनिष्का अनेकदा त्याच्यासोबत फक्त एक सोबत म्हणून जायची. पटावरच्या सोंगट्यांची हालचाल, त्यातील डावपेच ती कुतूहलाने पाहत असे.





तिची ही आवड प्रशिक्षक शर्मा यांच्या लक्षात आली आणि त्यांनी तिला खेळाचे प्राथमिक धडे दिले.

सध्या तनिष्का प्रशिक्षक सौरभ अरोरा आणि दीपक बत्रा यांच्या मार्गदर्शनाखाली आपल्या खेळाला अधिक धार देत आहे. तिचे वडील भूषण गर्ग आणि आई मीनू गर्ग तिच्या प्रत्येक गरजेकडे बारकाईने लक्ष देतात. तिच्या या प्रवासात बठिंडा येथील सिल्व्हर ओक्स स्कूलचेही मोठे सहकार्य लाभले आहे.

# टीम इंडियाचे वर्षाअखेरपर्यंत व्यस्त वेळापत्रक



**मुंबई : प्रतिनिधी**

भारतीय क्रिकेट संघाचा इंग्लंड दौरा नुकताच पूर्ण झाला. या दौऱ्यात शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील भारतीय संघाने यजमान इंग्लंडविरुद्ध पाच कसोटी सामन्यांची मालिका खेळली, जी २-२ अशा बरोबरीत सुटली. आता भारतीय संघापुढील आव्हान सप्टेंबरमध्ये नियोजित असलेली आशिया चषक स्पर्धा हे आहे.

आशिया चषक २०२५चे सामने संयुक्त अरब अमिराती (यूएई)मधील अबू धाबी आणि दुबई या दोन शहरांमध्ये खेळवले जातील. या स्पर्धेत भारताला पाकिस्तान, यजमान यूएई आणि ओमान या संघासोबत 'अ' गटामध्ये स्थान देण्यात आले आहे.

आशिया चषक स्पर्धेनंतर लगेचच वेस्ट इंडिजचा संघ भारत दौऱ्यावर येईल, जिथे दोन्ही संघांमध्ये दोन कसोटी सामन्यांची मालिका खेळवली जाईल. पहिला कसोटी सामना २ ऑक्टोबरपासून अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर, तर दुसरा सामना १० ऑक्टोबरपासून दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडियमवर खेळला जाईल.

वेस्ट इंडिजविरुद्धच्या कसोटी मालिकेनंतर काही दिवसांच्या अंतरानेच भारताचा ऑस्ट्रेलिया दौरा सुरू होईल. या दौऱ्याच्या सुरुवातीला तीन एकदिवसीय सामने खेळले जातील, ज्या मालिकेला १९ ऑक्टोबरपासून प्रारंभ होईल. त्यानंतर दोन्ही संघांमध्ये पाच सामन्यांची टी-२० मालिका २९ ऑक्टोबरपासून सुरू होईल.

ऑस्ट्रेलिया दौऱ्यानंतर भारतीय संघ मायदेशात दक्षिण आफ्रिकेविरुद्ध दोन कसोटी, तीन एकदिवसीय आणि पाच टी-२० सामने खेळणार आहे. पहिला कसोटी सामना १४ नोव्हेंबरपासून आणि दुसरा कसोटी सामना २२ नोव्हेंबरपासून खेळला जाईल. त्यानंतर एकदिवसीय मालिकेला ३० नोव्हेंबरपासून सुरुवात होईल, तर टी-२० मालिकेला ९ डिसेंबर रोजी सुरुवात होईल. मालिकेतील अखेरचा सामना १९ डिसेंबर रोजी खेळवला जाईल.

# केएल राहुल सर्वोत्कृष्ट खेळाडू -मोईन अली





**लंडन : वृत्तसंस्था**

इंग्लंडचा माजी अष्टपैलू खेळाडू मोईन अलीच्या मते, केएल राहुल हा जगातील सर्वोत्कृष्ट खेळाडू आहे. मोईन अलीने 'बर्ड बिफोर विकेट'या पॉडकास्टमध्ये बोलताना केएल राहुलचे तोंडभरून कौतुक केले.

मोईन अली म्हणाला, केएल राहुल हा सलामीवीर फलंदाज म्हणून किती उत्तम फलंदाज आहे हे अजूनही लोकांना कळालेले नाही. गेल्या वेळी जेव्हा भारताचा संघ इंग्लंडमध्ये आला होता, त्या वेळीदेखील त्याने दमदार कामगिरी केली होती. आताही त्याने दमदार कामगिरी केली आहे. शुबमन गिलने या मालिकेत सर्वाधिक धावा केल्या, पण मला वाटते केएल राहुलची भूमिका अतिशय महत्त्वाची होती. मी त्याला कित्येक वर्षांपासून खेळताना पाहतोय.

अली पुढे म्हणाला की, मला तरी हेच वाटते तो सर्वोत्कृष्ट फलंदाजांपैकी एक आहे. मी हे आधीही सांगितले आहे. केएल राहुलने इंग्लंड दौऱ्यावर दमदार कामगिरी करण्याची ही पहिलीच वेळ नाही. या दौऱ्यावर त्याने ५००पेक्षा अधिक धावा केल्या, तर गेल्या वेळी त्याने २००हून अधिक धावा केल्या होत्या. या वेळी फलंदाजी करताना त्याने लीड्स आणि लॉर्ड्स कसोटीत दमदार शतकी खेळी केली होती. लॉर्ड्सच्या मैदानावर शतक झळकावताच त्याच्या नावे विक्रमाची नोंद झाली, जो लॉर्ड्सच्या मैदानावर एकाहून अधिक शतके झळकावणारा दुसराच भारतीय फलंदाज ठरला. याआधी दिलीप वेंगसरकरांनी हा कारनामा केला होता. याआधी २०२१मध्येही त्याने लॉर्ड्सच्या मैदानावर शतक झळकावले होते.

# सुभाष पाटील यांची पंचपदी निवड



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

ऑस्ट्रेलियात १३ ते १७ ऑगस्ट या कालावधीत होणाऱ्या वर्ल्ड तायक्वॉन्डो प्रेसिडेंट कप, ओशनिया पॅरा व ऑस्ट्रेलियन ओपन तायक्वॉन्डो स्पर्धेसाठी पंच म्हणून महाराष्ट्रातून एकमेव आंतरराष्ट्रीय पंच व प्रशिक्षक तसेच कॉमनवेल्थ रेफरी तायक्वॉन्डो युनियनचे सदस्य सुभाष पाटील यांची निवड झाली आहे. सुभाष पाटील हे सातवी डिग्री ब्लॅक बेल्ट व आंतरराष्ट्रीय पंच आहेत.

या स्पर्धेसाठी पाटील हे १२ ऑगस्ट रोजी ऑस्ट्रेलियातील गोलकोस्ट येथे रवाना होणार आहेत. त्यांना तायक्वॅान्डो फेडरेशन ऑफ इंडिया, तायक्वॉडो असोसिएशन ऑफ महाराष्ट्र, रायगड तायक्वॉन्डो असोसिएशनचे सर्व पदाधिकारी, पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर, महापालिकेचे माजी सभागृह नेते परेश ठाकूर, नवी मुंबई महापालिकेच्या उपायुक्त अभिलाषा म्हात्रे यांनी विशेष शुभेच्छा दिल्या आहेत.

# पंतकडून विद्यार्थिनीला शैक्षणिक मदत



**बागलकोट : वृत्तसंस्था**

क्रिकेटपटू ऋषभ पंतने सामाजिक जाणीव दाखवत पैशांअभावी पुढचे शिक्षण थांबण्याची भीती असलेल्या विद्यार्थिनीचे कॉलेजचे शुल्क अदा केले आहे. त्यामुळे पंतचे कौतुक आहे.

बागलकोट जिल्ह्यातील रबकवी येथील ज्योती कनबूर या विद्यार्थिनीने बारावीत ८३ टक्के गुण मिळविले. तिला बीसीए अभ्यासक्रमाला प्रवेश घ्यायचा होता. तिचे वडील तीर्थय्या हे गावात चहाचा गाडा चालवतात. त्यांना ज्योतीच्या प्रवेशासाठी आवश्यक असलेली ४० हजारांची रक्कम जमवणे अवघड जात होते. तीर्थय्यांनी आपल्या ओळखीचे एक ठेकेदार अनिल हुनशीकट्टी यांना ही अडचण सांगितली तसेच बीएलडीई कॉलेजमध्ये बीसीएला प्रवेश मिळवून द्यावा, अशी विनंती केली.

आयपीएलसाठी बंगळुरूला वारंवार जाणाऱ्या हुनशीकट्टी यांची क्रिकेटपटू पंतशी स्पर्धेदरम्यान जवळीक झाली आहे. त्यांनी पंतशी संपर्क साधला आणि ज्योतीच्या घरच्या परिस्थितीची कल्पना दिली. लगेचच पंतने ४० हजार रुपयांची पहिल्या सेमिस्टरची फी महाविद्यालयाच्या खात्यात पाठवली. शिवाय भविष्यातही अडचण आल्यास संपर्क साधण्याचे आवाहन केले.

ज्योतीला आर्थिक मदत करून ऋषभ पंतने माणुसकीचे दर्शन घडविले आहे. परिस्थितीअभावी शिक्षण थांबणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी असेच ऋषभ पंत निर्माण व्हावेत, अशी प्रतिक्रिया तीर्थय्या यांनी व्यक्त केली.

# पिवळ्या जर्सीतच, पण... धोनीच्या विधानाने चर्चेला उधाण

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**



भारतीय क्रिकेटचा यशस्वी कर्णधार आणि चेन्नई सुपर किंग्जचा (सीएसके) 'थाला' महेंद्रसिंह धोनी आयपीएलमधून निवृत्ती घेणार का, या चर्चांना पुन्हा एकदा उधाण आले आहे. एका कार्यक्रमादरम्यान धोनीने आपल्या भविष्याबद्दल एक अत्यंत सूचक विधान केले असून मी पिवळ्या जर्सीमध्येच असेन, पण खेळत असेन की नाही ही वेगळी गोष्ट आहे, असे म्हणत त्याने चेन्नईसोबतच्या आपल्या अतूट नात्यावर भर दिला.

धोनी म्हणाला, मी आणि सीएसके नेहमीच एकत्र आहोत. पुढील १५-२० वर्षे ही हे नाते असेच राहील, पण याचा अर्थ मी पुढील १५-२० वर्षे खेळणार आहे, असा घेऊ नका, असेही त्याने स्मित हास्यासह स्पष्ट केले. चेन्नई आणि संघासोबतच्या आपल्या नात्यावर बोलताना तो पुढे म्हणाला, या नात्यामुळे एक व्यक्ती आणि एक खेळाडू म्हणून माझ्यात खूप सुधारणा झाली. चेन्नईसोबतचे हे नाते माझ्यासाठी खूप खास आहे.

धोनी २००८पासून आयपीएलच्या पहिल्या हंगामापासून चेन्नई संघाचा अविभाज्य भाग आहे. त्याच्या नेतृत्वाखाली संघाने विक्रमी पाच वेळा विजेतेपद पटकावले आहे, मात्र गेल्या काही हंगामात संघाची कामगिरी निराशाजनक राहिली आहे. यावर बोलताना धोनी म्हणाला, गेले काही हंगाम आमच्यासाठी चांगले नव्हते, पण महत्त्वाचे आहे ते चुकांमधून शिकणे. काय चुकले याचे विश्लेषण करत आम्ही ताज्या दमाने रणनीतीत बदल करू.






# वर्कलोड ही एक मानसिक बाब -गावसकर

**लंडन : वृत्तसंस्था**

भारत विरुद्ध इंग्लंड कसोटी मालिकेतील अखेरच्या सामन्यात नऊ बळी घेत भारताच्या ऐतिहासिक विजयात मोलाचा वाटा उचलणाऱ्या मोहम्मद सिराजवर कौतुकाचा वर्षाव होत आहे. संपूर्ण मालिकेत तब्बल १८५.२ षटके गोलंदाजी करणाऱ्या सिराजच्या अथक परिश्रमाचे कौतुक करताना भारताचे महान फलंदाज आणि माजी कर्णधार सुनील गावसकर यांनी 'वर्कलोड' अर्थात कामाच्या ताणाच्या संकल्पनेवरच सडकून टीका केली आहे. सिराजने आपल्या कामगिरीतून वर्कलोड ही केवळ एक मानसिक बाब असल्याचे सिद्ध केले आहे, असे मत त्यांनी व्यक्त केले.



लंडनच्या केनिंग्टन ओव्हल मैदानावर झालेल्या या कसोटी सामन्यात मोहम्मद सिराजने आपल्या भेदक गोलंदाजीने सर्वांना प्रभावित केले. ४ ऑगस्ट रोजी इंग्लंडच्या गस टकिन्सनची दांडी गुल करणारा चेंडू हा पाच कसोटी सामन्यांच्या प्रदीर्घ मालिकेनंतर सिराजने टाकलेला मालिकेतील पाचवा सर्वात वेगवान चेंडू होता. यावरून त्याच्या तंदुरुस्तीचा आणि क्षमतेचा अंदाज येतो.

'इंडिया टुडे'शी संवाद साधताना सुनील गावसकर यांनी सिराजच्या कामगिरीचे विश्लेषण केले. ते म्हणाले, नेहमीच म्हटले जाते की गोलंदाज सामने जिंकून देतात, परंतु सत्य हे आहे की तुम्हाला धावादेखील कराव्या लागतात. भारताला पुरेशा धावा करता आल्या नाहीत, म्हणूनच त्यांना दोन सामने गमवावे लागले. मला वाटते की सिराजने आपले सर्वस्व झोकून देऊन गोलंदाजी केली आणि त्याने या वर्कलोडच्या संकल्पनेला कायमचे मोडीत काढले आहे.'

गावसकर पुढे म्हणाले, मला आशा आहे की वर्कलोड हा शब्द भारतीय क्रिकेटच्या परिभाषेतून हद्दपार होईल. मी हे बऱ्याच काळापासून सांगत आलो आहे. सिराजने पाच कसोटी सामन्यांमध्ये कर्णधाराच्या आणि देशाच्या अपेक्षेनुसार सलग ६, ७, ८ षटकांचे स्पेल टाकले. मला वाटते की, आपण सर्वांनी ही एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की हा वर्कलोड केवळ एक मानसिक अडथळा आहे, शारीरिक नाही.

खेळाडूंच्या मानसिकतेचे महत्त्व अधोरेखित करताना गावसकर यांनी एक अत्यंत भावनिक पण तितकाच कठोर संदेश दिला. त्यांच्या मते, कामाच्या ताणाच्या तकलादू सबबीपुढे जर तुम्ही नमते घेतले, तर तुमचे खरे शिलेदार रणांगणात उतरणारच नाहीत. खेळाडूंना हे स्पष्टपणे सांगावे लागेल की, जेव्हा तुम्ही देशाचे प्रतिनिधित्व करता, तेव्हा शारीरिक वेदना या दुय्यम ठरतात. त्या क्षणी, त्या वेदना विसरण्याची हिंमत तुमच्यात असायलाच हवी.

या वेळी त्यांनी भारतीय जवानांचे उदाहरण दिले. देशाच्या सीमेवर लढणाऱ्या सैनिकांकडून तुम्ही हीच अपेक्षा ठेवता. सैनिक कधी थंडीची किंवा प्रतिकूल परिस्थितीची तक्रार करतात असे तुम्हाला वाटते का? ते देशासाठी आपले प्राण देण्यासाठी तिथे असतात. देशासाठी आपले सर्वोत्तम द्या. दुखापतीच्या वेदनेची चिंता करू नका. ऋषभ पंतने तुम्हाला काय दाखवून दिले? तो फ्रॅक्चर असतानाही फलंदाजीसाठी मैदानात उतरला होता. तुमच्या संघाकडून तुम्ही अशीच अपेक्षा ठेवता, असे म्हणत गावसकर यांनी खेळाडूंना देशासाठी खेळण्याच्या भावनेचे महत्त्व पटवून दिले.






दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com